cmyk

## संपादकीय

### रिक्षाच्या हँडलवरून मराठीचा सन्मान

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात मराठी भाषेचे स्थान हे केवळ व्यवहारापुरते मर्यादित नाही, तर ते राज्याच्या सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने १ मे, महाराष्ट्र दिनापासून रिक्षाचालकांसाठी मराठी बोलणे आणि वाचणे सक्तीचे करण्याचा घेतलेला निर्णय हा केवळ प्रशासकीय उपक्रम नसून एक व्यापक सामाजिक आणि सांस्कृतिक संदेश देणारा आहे. 'मायबोली'शी नाळ जपण्याचा हा प्रयत्न असला, तरी त्याची अंमलबजावणी आणि परिणाम यांचा विचार अधिक व्यापक दृष्टिकोनातून करणे आवश्यक ठरते.

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–३० | शनिवार दि.१८ एप्रिल २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### निदा खानची आयटी कंपनीतून हकालपट्टी

नाशिक : नाशिकमधील एका नामांकित आयटी कंपनीत महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण आणि धर्मांतरासाठी दबाव टाकल्याचे प्रकरण संपूर्ण राज्यात गाजत आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी निदा खान हिच्यावर आता कंपनीने मोठी कारवाई केली आहे. कंपनीने निदा खानला तात्काळ प्रभावाने सेवेतून निलंबित केले असून तसे अधिकृत पत्र जारी केले आहे. संबंधित कंपनीचे हे पत्र ९ एप्रिल रोजीचे असल्याची माहिती समोर आली आहे. निदा खान हिला पाठवलेल्या निलंबन पत्रात अत्यंत कडक शब्दांत सूचना दिल्या आहेत. तुमच्याविरुद्ध एक अत्यंत गंभीर प्रकरण नोंदवले गेल्याची माहिती कंपनीला मिळाली आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता व्यवस्थापनाने तुम्हाला तात्काळ निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. निलंबनासोबतच निदा खानचा कंपनीच्या अंतर्गत नेटवर्कवरील प्रवेश तात्पुरता रद्द करण्यात आला आहे. तसेच, कंपनीच्या कोणत्याही कार्यालयात किंवा घरून काम करण्यासही मनाई करण्यात आली आहे.

### दुहेरी नागरिकत्व: राहूल गांधी विरोधात एफआयआर

लखनौ : काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या दुहेरी नागरिकत्वाच्या मुद्द्यावरून आता एक मोठे कायदेशीर वळण समोर आले आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने या प्रकरणी राहुल गांधी यांच्याविरोधात एफआयआर नोंदवण्याचे निर्देश पोलिसांना दिले आहेत. न्यायमूर्ती सुभाष विद्यार्थी यांच्या खंडपीठाने दिलेल्या या आदेशामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. राहुल गांधी यांच्याकडे भारतासोबतच ब्रिटनचेही नागरिकत्व असल्याचा आरोप या याचिकेत करण्यात आला आहे. भारतीय संविधानानुसार, कोणत्याही व्यक्तीला दुहेरी नागरिकत्व ठेवता येत नाही. जर एखादी व्यक्ती दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्वीकारत असेल, तर तिचे भारतीय नागरिकत्व आपोआप संपुष्टात येते. अशा परिस्थितीत ती व्यक्ती भारतात निवडणूक लढवण्यास किंवा संसदेचे सदस्य होण्यास अपात्र ठरते. राहुल गांधी यांनी २०२४ ची लोकसभा निवडणूक रायबरेली मतदारसंघातून जिंकली आहे, त्यामुळे या आरोपाचे गांभीर्य अधिक वाढले आहे.

### व्यापारी जहाजांसाठी होर्मुझची सामुद्रधुनी 'पूर्णपणे खुली'

तेहराण: लेबनॉन आणि इस्रायलमधील १० दिवसांच्या युद्धविरामानंतर पश्चिम आशियातून एक मोठी सकारात्मक बातमी समोर येत आहे. लेबनॉनमधील शस्त्रसंधीचा आदर राखत इराणने 'होर्मुझची सामुद्रधुनी' सर्व व्यापारी जहाजांच्या वाहतुकीसाठी पूर्णपणे खुली केली आहे. इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून ही माहिती दिली. परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत लेबनॉनमध्ये युद्धविराम लागू असेल, तोपर्यंत होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सर्व व्यापारी जहाजांना विनाअडथळा प्रवास करता येईल. मार्ग खुला केला असला तरी, इराणने काही सुरक्षा निर्बंध कायम ठेवले आहेत. जहाजांना केवळ इराणने आखून दिलेल्या 'समन्वयित मार्गावरूनच' प्रवास करावा लागणार आहे. इराणने यापूर्वीच स्पष्ट केले होते की, जोपर्यंत लेबनॉनमध्ये युद्धविराम होत नाही, तोपर्यंत कोणत्याही करारावर चर्चा होणार नाही. त्यामुळे ही घोषणा महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१५ एप्रिल २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२४.०० क्विंटल | १,९०० | २,६५७ | २,२४५ |
| ज्वारी/हायब्रिड: २४८.०० क्विंटल | २,००० | ५,२०० | २,८७० |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १०.०० क्विंटल | ७,४०० | ७,४०० | ७,४०० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: १२२.०० क्विंटल | २,२०० | २,८०० | २,४३९ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| हरभरा: ३.५० क्विंटल | ४,४०१ | ५,१५० | ४,७७५ |

# अवकाळीच्या संकटातून सावरण्यासाठी ५३ कोटी

## राज्यातील ६६ हजारांहून अधिक शेतकरी बाधित



पुणे । प्रतिनिधी

**राज्यात अवकाळी पाऊस व अतिवृष्टीमुळे शेती, घरे व पायाभूत सुविधांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने दिलासादायक निर्णय घेत ५३ कोटी ७३ लाख ७ हजार रुपयांच्या मदतीचा महत्त्वपूर्ण शासन निर्णय निर्गमित केला आहे. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी याबाबत माहिती देताना, या निर्णयामुळे राज्यातील हजारो बाधित कुटुंबांना तातडीचा आधार मिळणार असल्याचे स्पष्ट केले.**

शासनाकडून उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार, राज्यातील विविध विभागांतील एकूण ६६ हजार ३१२ शेतकरी बाधित झाले असून, सुमारे ४९ हजार ५११.७२ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीची तीव्रता लक्षात घेता शासनाने तातडीने आर्थिक मदत मंजूर करत पुनर्वसन प्रक्रियेला गती दिली आहे. नागपूर विभागात वर्धा, गोंदिया आदी जिल्ह्यांमध्ये १,५०४ शेतकरी बाधित होऊन ६६५.५२ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले असून, त्यासाठी ११३.१५ लाख रुपयांची मदत प्रस्तावित आहे. पुणे विभागात सोलापूर व सातारा जिल्ह्यांमध्ये मिळून ४,५६४ शेतकरी बाधित झाले असून, ९६६.२ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे; यासाठी ५७७.९३ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. अमरावती विभागात सर्वाधिक फटका बसला असून, बुलढाणा, यवतमाळ व इतर भागांतील ५१ हजार ७२९ शेतकरी बाधित झाले आहेत. या विभागात तब्बल ४२ हजार ३८८.९७ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले असून, त्यासाठी ४२३७.९७ लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात नांदेड, लातूर व बीड जिल्ह्यांमध्ये मिळून ८,५१५ शेतकरी बाधित झाले असून, ३,४९१.०३ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाले आहे. या भागासाठी ४४४.०२ लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी सांगितले की, नुकसानग्रस्तांना त्वरित मदत मिळावी यासाठी पंचनामे जलदगतीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले असून, मदत वितरण प्रक्रियेत पारदर्शकता व वेग राखण्यावर शासनाचा

▶▶ पान २ वर

# महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक नामंजूर

## विधेयकाच्या बाजूने २९८ तर विरोधात २३० मते, केंद्र सरकारला धक्का, इतर दोन विधेयके सरकारकडून मागे

दिल्ली । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयक, २०२६, केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक, २०२६ आणि सीमांकन विधेयक, २०२६ लोकसभेत सादर केली होती. या विधेयकांच्या बाजूने पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह सत्ताधारी पक्षातील विविध नेत्यांनी भूमिका मांडली. तर, विरोधी पक्षांकडून अखिलेश यादव, प्रियांका गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, अरविंद सावंत, अमोल कोल्हे, वर्षा गायकवाड, कल्याण बॅनर्जी



यांच्यासह विरोधी पक्षांनी बाजू मांडली. हे घटनादुरुस्ती विधेयक असल्याने मंजूर करण्यासाठी लोकसभेतील उपस्थित सदस्यांच्या दोन तृतियांश मते आवश्यक असतात. लोकसभेत या घटनादुरुस्ती विधेयकावर मतविभाजनाद्वारे मतदान घेण्यात आले. घटनादुरुस्तीच्या बाजूने पहिल्या फेरीत २९८ मतदान झाले, तर घटनादुरुस्ती विधेयकाच्या विरोधात २३० मते नोंदवली गेली. एकूण ५२८ खासदारांनी मतदानं केले, आता राज्यसभेत उद्या मतदान होणार आहे. घटनादुरुस्ती विधेयक मंजुरीसाठी आवश्यक संख्याबळ सरकारकडे नसल्याचे स्पष्ट झाले. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला

▶▶ पान २ वर

### हा सत्तेवर कायमचा ताबा मिळवण्यासाठीचा घाट



महिला आरक्षण विधेयकाच्या आडून केंद्र सरकार देशातील मतदारसंघांची पुनर्रचना (डिलिमिटेशन) करून सत्तेवर कायमस्वरूपी ताबा मिळवण्याचा प्रयत्न करत असल्याची टिका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली. या प्रक्रियेद्वारे दक्षिण भारत आणि महाराष्ट्र, पश्चिम बंगाल यांसारख्या राज्यांचे हिंदीकरण करण्याचा डाव आखला जात असल्याचा दावाही त्यांनी आपल्या फेसबुक पोस्टद्वारे केला आहे. राज ठाकरे यांनी केंद्राच्या घाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना म्हटले की, महिला आरक्षणाबाबतच्या दुरुस्त्यांवर चर्चा सुरू असतानाच गुरुवारी रात्री केंद्र सरकारने अचानक या विधेयकाची अंमलबजावणी १७ एप्रिलपासून लागू होत असल्याची अधिसूचना काढली. जर चर्चा अपूर्ण होती, तर सरकारला इतकी घाई कशासाठी होती, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मनसेचा महिला आरक्षणाला कधीही विरोध नव्हता आणि महिलांना कायदेमंडळात प्रतिनिधित्व मिळणे ही आनंदाचीच बाब आहे, परंतु या विधेयकाच्या नावाखाली जो राजकीय खेळ सुरू आहे तो धोकादायक असल्याचे त्यांनी नमूद केले.

### "महिला आरक्षणाच्या आडून देशाचा निवडणूक नकाशा बदलण्याचा डाव – राहूल गांधी

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर जोरदार प्रहार केला. पहिले सत्य म्हणजे, हे एक महिला विधेयक नाही. याचा महिलांच्या सक्षमीकरणाशी कसलाही संबंध नाही. महिला आरक्षणाच्या आडून देशाचा निवडणूक नकाशा बदलण्याचा हा एक डाव आहे, असे राहुल गांधी यांनी महिला आरक्षण विधेयक आणि मतदार संघ पुनर्रचना विधेयकांवर संसदेच्या विशेष अधिवेशनातील चर्चेदरम्यान म्हटले. त्यांच्या विधानांवरून लोकसभेत जोरदार गदारोळ झाला. देशातील समाजाने दलित, ओबीसी आणि त्यांच्या महिलांना कशी वागणूक दिली, हे एक ऐतिहासिक सत्य आहे. येथे जातीनिहाय जनगणनेला बगल देण्याचा प्रयत्न केला जातो आहे की काय?. आपल्या ओबीसी बंधू-भगिनींना सत्तेपासून आणि प्रतिनिधित्व देण्यापासून दूर ठेवण्याचा तसेच त्यांचे अधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. सरकार दलितांना हिंदू असल्याचे म्हणते, परंतु देशात त्यांना स्थान दिले जात नाही, असा आरोपही राहुल गांधींनी केला. मतदार संघ पुनर्रचनेवर बोलताना त्यांनी मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

# भोंदू खरात प्रकरणातील महत्त्वाचा साक्षीदार ठार



मुंबई । प्रतिनिधी

**भोंदू अशोक खरातच्या शिवनिका ट्रस्टचे उपाध्यक्ष डॉक्टर जितेंद्र शेळके यांचा अपघाती मृत्यू झाला. त्यांच्या कारने समृद्धी महामार्गावर उभ्या असणाऱ्या एका कंटेनरला मागच्या बाजूने जोरदार धडक दिली. त्यात जितेंद्र शेळके यांच्यासह त्यांच्या पत्नीचा जागीच मृत्यू झाला.**

यासंबंधीच्या माहितीनुसार, जितेंद्र शेळके शुक्रवारी दुपारी १ च्या सुमारास आपल्या कुटुंबासह छत्रपती संभाजीनगरहून शिर्डीच्या दिशेने जात होते. रस्त्यात समृद्धी महामार्गावरील धोत्रे गावालगत त्यांच्या कारने रस्त्याच्या कडेला उभ्या असणाऱ्या एका कंटेनरला मागच्या बाजूने जोरदार धडक दिली. त्यात जितेंद्र शेळके व त्यांची पत्नी अनुराधा हे दोघे जागीच ठार झाले. तर त्यांचा मुलगा गंभीर जखमी झाला. ही धडक एवढी भीषण होती की, त्यांची कार थेट कंटेनरखाली घुसली. त्यामुळे तिचा अक्षरश: चुराडा झाला. जखमी मुलाला लगतच्या रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले आहे .जितेंद्र शेळके यांची कार कंटेनरला

▶▶ पान २ वर

## मस्साजोगची सरपंचपदाची पोटनिवडणूक अटळ

बीड । प्रतिनिधी

मस्साजोगचे दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर रिक्त झालेल्या सरपंचपदाची पोटनिवडणूक बिनविरोध होणार, हे आता स्पष्ट झाले आहे. अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी पाच पैकी केवळ तीन उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर आता अश्विनी देशमुख – स्वरूपानंद देशमुख अशी मस्साजोगच्या सरपंच पदासाठी लढत होणार आहे. अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेनंतर चिन्हाचे वाटप देखील करण्यात आले. त्यामुळे सरपंचपदाची निवडणूक होणार असल्याचे निश्चित झाले असून देशमुख विरुद्ध देशमुख असाच सामना रंगणार आहे.

मस्साजोगच्या सरपंच पदाची पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी अशी दिवंगत संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची अपेक्षा होती. मात्र, अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी पाच उमेदवारांपैकी

▶▶ पान २ वर

## आरोपी वाल्मिक कराडची प्रकृती बिघडली; जिल्हा रुग्णालयात दाखल

बीड । प्रतिनिधी

**केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाला दीड वर्ष पूर्ण होत असतानाच या प्रकरणात एक नवीन घडामोड समोर आली आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार आणि मास्टरमाईंड म्हणून ओळखला जाणारा आरोपी वाल्मिक कराड याची प्रकृती अचानक बिघडल्याने त्याला तातडीने बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.**

सध्या हे संपूर्ण प्रकरण न्यायप्रविष्ठ असून बीडच्या विशेष मकोका न्यायालयात याची सुनावणी सुरू आहे. या प्रकरणातील सर्व आरोपी सध्या कारागृहात आहेत. विष्णू चाटे हा लातूर कारागृहात ठेवण्यात आला आहे, तर इतर आरोपी बीड जिल्हा कारागृहात आहेत. या प्रकरणातील



आरोपी जयराम चाटे याला त्याच्या भावाच्या निधनानिमित्त एक दिवसासाठी कारागृहाबाहेर येण्याची परवानगी देण्यात

▶▶ पान २ वर

## चंद्रकांत पाटलांच्या वक्तव्याने भुवया उंचावल्या

### प्रवीण दरेकर पुढचे सहकार मंत्री

मुंबई । प्रतिनिधी

मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलेल्या वक्तव्याची सध्या जोरदार चर्चा सुरु आहे. प्रवीण दरेकरांच्या नावासमोरचा कॅबिनेट दर्जा जाऊन ते पुढचे सहकार मंत्री व्हावेत, असे वक्तव्य चंद्रकातं पाटील यांनी केले आहे. त्यामुळे अर्थ खात्यापाठोपाठ आता सहकार खात्यावरही भाजपचा डोळा आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.



प्रवीण दरेकरांच्या नावासमोरचा कॅबिनेट दर्जा जाऊन ते पुढचे सहकार मंत्री व्हावेत, अशा शुभेच्छा पाटील यांनी दिल्या आहेत. त्यानंतर बोलतना पाटील म्हणाले की, भाषणात असे बोलावे लागते.

प्रवीण दरेकर यांच्या नावामागील

▶▶ पान २ वर

# १ जूनपासून राज्यातील सर्व बस स्थानकांतील स्वच्छतागृहे होणार मोफत

## मंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा, प्रवाशांना मोठा दिलासा

कोल्हापूर । प्रतिनिधी

**राज्यातील लाखो प्रवाशांसाठी एक अत्यंत आनंदाची आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. येत्या १ जूनपासून महाराष्ट्र राज्यातील सर्व बस स्थानकांवरील स्वच्छतागृहे प्रवाशांसाठी पूर्णपणे मोफत केली जाणार आहेत. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी कोल्हापूर दौऱ्यावर असताना ही महत्त्वपूर्ण घोषणा केली.**

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक शुक्रवारी कोल्हापूर दौऱ्यावर होते.




### प्रवाशांची गैरसोय खपवून घेतली जाणार नाही

१ जूनपासून महाराष्ट्रातील प्रत्येक एसटी स्थानकावर प्रवाशांना मोफत स्वच्छतागृहाची सुविधा मिळेल, यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता कोल्हापुरातील मध्यवर्ती बस स्थानकाला अचानक भेट दिली. मंत्र्यांच्या या धाडसी निर्णयामुळे स्थानकावरील प्रशासकीय अधिकाऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली. या भेटीदरम्यान त्यांनी बस स्थानकातील कॅन्टीन आणि स्वच्छतागृहांची प्रत्यक्ष पाहणी केली. स्वच्छतागृहाची पाहणी करताना तिथली चकाकी पाहून मंत्र्यांनी कंत्राटदाराला टोला लगावला. मी येणार आहे म्हणून ही एवढी स्वच्छता केली आहे का? असा सवाल करत त्यांनी कर्मचाऱ्यांना धारेवर धरले. महत्त्वाचे म्हणजे, अनेक बस स्थानकांवर स्वच्छतागृहासाठी प्रवाशांकडून जादा पैसे आकारले जात असल्याच्या तक्रारी वारंवार येत होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत सरनाईक यांनी संबंधित कंत्राटदाराला जाब विचारला आणि नियमांचे उल्लंघन झाल्यास कडक कारवाईचा इशारा दिला. केवळ

▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# रिक्षाच्या हँडलवरून मराठीचा सन्मान : सक्ती की संवेदनशीलता?

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात मराठी भाषेचे स्थान हे केवळ व्यवहारापुरते मर्यादित नाही, तर ते राज्याच्या सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने १ मे, महाराष्ट्र दिनापासून रिक्षाचालकांसाठी मराठी बोलणे आणि वाचणे सक्तीचे करण्याचा घेतलेला निर्णय हा केवळ प्रशासकीय उपक्रम नसून एक व्यापक सामाजिक आणि सांस्कृतिक संदेश देणारा आहे. 'मायबोली'शी नाळ जपण्याचा हा प्रयत्न असला, तरी त्याची अंमलबजावणी आणि परिणाम यांचा विचार अधिक व्यापक दृष्टिकोनातून करणे आवश्यक ठरते.

खरं तर, हा नियम काही नवीन नाही. 'महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९' मधील तरतुदींनुसार सार्वजनिक वाहतुकीच्या परवान्यासाठी स्थानिक भाषेचे ज्ञान आवश्यक आहे. मात्र, तीन दशकांहून अधिक काळ या नियमाची अंमलबजावणी शिथिल राहिली. परिणामी, शहरीकरणाच्या वाढत्या लाटेसोबत बाहेरून येणाऱ्या कामगार वर्गाने या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रवेश केला, पण स्थानिक भाषेचा स्वीकार तितक्याच प्रमाणात झाला नाही. या पार्श्वभूमीवर आता घेतलेली भूमिका ही नियमांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न असला, तरी तो अचानक आणि कठोर वाटण्याची शक्यता नाकारता येत नाही. मराठीला 'अभिजात भाषा' म्हणून मिळालेला दर्जा हा निःसंशय अभिमानाचा विषय आहे. मात्र, भाषेचा खरा गौरव तिच्या दैनंदिन वापरात असतो. रिक्षाचालक हा समाजातील असा घटक आहे, जो थेट जनतेच्या संपर्कात असतो. प्रवासी आणि चालक यांच्यातील संवाद सुलभ, सुसंवादी आणि सुरक्षित असणे अत्यंत गरजेचे आहे. विशेषतः महिला, वृद्ध आणि अपंग प्रवाशांसाठी स्थानिक भाषेत संवाद साधता येणे ही केवळ सोय नसून सुरक्षिततेची गरज आहे. त्यामुळे या निर्णयामागील हेतू योग्य असला, तरी त्याची अंमलबजावणी संवेदनशीलतेने होणे तितकेच महत्त्वाचे आहे. या निर्णयाकडे राजकीय चष्म्यातूनही पाहिले जात आहे. 'मराठी अस्मिता' हा मुद्दा महाराष्ट्राच्या राजकारणात नेहमीच प्रभावी राहिला आहे. सत्ताधारी पक्षाने या मुद्द्यावर आपली पकड अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केल्याची चर्चा असली, तरी भाषेच्या सन्मानाचा प्रश्न हा पक्षीय राजकारणापलीकडचा आहे. जर या निर्णयामुळे मराठी भाषेचा वापर वाढणार असेल, तर त्याचे स्वागत व्हायला हवे. मात्र, भाषेच्या नावाखाली दंडुकेशाही होऊ नये, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. अंमलबजावणीच्या दृष्टीने पाहता, ५९ प्रादेशिक परिवहन कार्यालयांमार्फत लाखो रिक्षाचालकांची भाषा परीक्षा घेणे हे मोठे आव्हान आहे. केवळ १५ दिवसांच्या कालावधीत ही प्रक्रिया पूर्ण करणे व्यवहार्य ठरणार नाही. त्यामुळे सरकारने टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्याचा विचार करायला हवा. नवीन परवान्यांसाठी नियम कडक ठेवणे योग्य आहे; परंतु जुन्या चालकांना मराठी शिकण्यासाठी कालमर्यादा देणे, प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे आणि शैक्षणिक मदत उपलब्ध करून देणे अधिक परिणामकारक ठरेल.

भाषेचा सन्मान हा सक्तीने नव्हे, तर स्वीकृतीने वाढतो. मराठी ही केवळ संवादाचे माध्यम नाही, तर ती महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख आहे. ज्या भूमीने रोजगार दिला, त्या भूमीच्या भाषेचा आदर करणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे. मात्र, हा आदर भीतीतून नव्हे, तर आत्मीयतेतून निर्माण व्हायला हवा. शेवटी, रिक्षाच्या मीटरप्रमाणेच हा भाषिक निर्णयही योग्य संतुलन राखून पुढे गेला, तर तो सामाजिक सलोखा आणि सांस्कृतिक एकात्मता वाढवणारा ठरेल. प्रशासनाने कडक कारवाईपेक्षा संवाद, प्रशिक्षण आणि जनजागृतीवर भर दिला, तर 'मराठीचा सन्मान' हा घोषवाक्यापुरता न राहता तो प्रत्यक्ष व्यवहारात उतरलेला दिसेल. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने घेतलेला हा निर्णय, जर संयम आणि समन्वयाने राबवला गेला, तर तो खऱ्या अर्थाने 'अभिजात' ठरेल.

# उष्णतेचा इशारा; बीडसह मराठवाड्यात सतर्कता वाढवण्याचे आवाहन–आपत्कालीन मदत कक्ष सज्ज

**बीड । प्रतिनिधी**

**राज्यात वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर उष्णतेच्या लाटेचा धोका लक्षात घेऊन प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला असून बीड जिल्ह्यासह मराठवाडा विभागात विशेष दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे . महाराष्ट्र हा देशातील उष्णतेस संवेदनशील असलेल्या अग्रक्रमातील राज्यांपैकी एक असून राज्य उष्णता कृती आराखड्यानुसार विदर्भ , मराठवाडा आणि खानदेशातील काही जिल्हे अत्यंत जोखमीचे म्हणून ओळखले गेले आहेत . लातूर , नांदेड , जळगाव , धुळे यांसारख्या जिल्ह्यांबरोबरच बीड जिल्ह्यातही उष्णतेचा तीव्र परिणाम जाणवण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे .**



या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन विभागाने राज्यभरातील नियंत्रण कक्ष सज्ज ठेवले असून नागरिकांना कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ मदत मिळावी यासाठी महत्त्वाचे संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत . जिल्हा नियंत्रण कक्ष ( १०७७) , रुग्णवाहिका सेवा ( १०८ ) , पोलीस मदत ( ११२ / १०० ) तसेच राज्य नियंत्रण कक्ष ( १०७० ) हे क्रमांक नागरिकांसाठी कार्यरत आहेत . याशिवाय हवामान विभाग , पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाचे नियंत्रण कक्षही सतत कार्यरत ठेवण्यात आले आहेत . उष्णतेमुळे उष्माघात , निर्जलीकरण आणि इतर आरोग्य समस्या उद्भवण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे . दुपारच्या वेळेत बाहेर पडणे टाळावे , भरपूर पाणी पिणे , हलके व सैल कपडे परिधान करणे तसेच लहान मुले , ज्येष्ठ नागरिक आणि शेतकरी बांधवांनी विशेष दक्षता घ्यावी , असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे . ग्रामीण भागात शेतात काम करणाऱ्या मजुरांसाठी सावलीची आणि पाण्याची व्यवस्था करणे आवश्यक असल्याचेही अधोरेखित करण्यात आले आहे. या संदर्भात बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नागरिकांना आवाहन केले की , " उष्णतेच्या पार्श्वभूमीवर प्रत्येकाने स्वतःची आणि आपल्या कुटुंबाची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे . प्रशासन सर्वतोपरी सज्ज असून कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी त्वरित संपर्क साधावा . शासनाच्या सूचनांचे पालन करून आपण सर्वांनी सुरक्षित राहणे हीच काळाची गरज आहे. एकूणच, वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर प्रशासन आणि नागरिक यांचा समन्वय महत्त्वाचा ठरत असून योग्य खबरदारी आणि जागरूकतेमुळे उष्णतेच्या संकटावर मात करता येईल , असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे .

# येळंबघाट येथे भागवत कथा व किर्तन



**येळंब (घाट) । प्रतिनिधी**

**येथील रत्नमुरली निवास, झांबरे वस्ती येथे कै. मुरलीधर विठोबा झांबरे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त भव्य वर्षश्राद्ध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भजनी मंडळ व समस्त गावकरी मंडळ, येळंब यांच्या वतीने हा कार्यक्रम संपन्न होणार आहे.**

मंगळवार दि. १४ एप्रिल २०२६ ते सोमवार दि. २० एप्रिल २०२६ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. दैनंदिन कार्यक्रमात सकाळी ६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम, ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण व सायं. ५ ते ७ हरिपाठ होईल. या सप्ताहात सुप्रसिद्ध कीर्तनकार झी टॉकीज फेम ह.भ.प. रुपालीताई सवणे परतुरकर (अध्यक्ष– राधा माधव मुलींचे वारकरी गुरुकुल) यांची दुपारी १ ते ४ या वेळेत श्रीमद्? भागवत कथा आयोजित केली आहे. मंगळवार दि. २१ एप्रिल २०२६* रोजी होणार असून, या दिवशी सकाळी ९:३० ते ११:३० या वेळेत ह.भ.प. समाधान महाराज शर्मा, केज यांचे कीर्तन होणार आहे. झांबरे परिवारातील श्री. अरुण मुरलीधर झांबरे, श्री. बाळु मुरलीधर झांबरे, श्री. प्रभाकर मुरलीधर झांबरे व समस्त झांबरे परिवाराने सर्व भाविक भक्तांनी व ग्रामस्थांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून कथेचा व कीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## सीबीएसई बोर्डच्या दहावी परीक्षेत स्वानंद हिरवे यांचे सुयश

**जालना । प्रतिनिधी**



जालना- २०२६ या वर्षीच्या सीबीएसईच्या दहावीच्या जाहीर झालेल्या निकालात जालना येथील ऋषी विद्यालय खरपुडीचा विद्यार्थी स्वानंद श्रीपाद हिरवे जालना याने ९०.६० % गुण घेऊन यश मिळविले आहे त्यांच्या या यशाबद्दल शाळेचे शिक्षक नातेवाईक व परिसरात सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

# बीडचे शिक्षणाधिकारी मयुरेश मोरे

**बीड । प्रतिनिधी**

**एकत्रित परीक्षाधीन राज्यातील परीक्षा १० अंतर्गत ५ परीक्षाधीन शिक्षणाधिकारी यांना दि. २० एप्रिल २०२६ पासून स्वतंत्र पदभार देण्याचे आदेश शालेय शिक्षण विभागाने दि.१७ एप्रिल २०२६ रोजी निर्गमित केले आहेत.**

बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी या रक्त पदावर मयुरेश विकास मोरे यांनी नियुक्ती करण्यात आली आहे. निलेश अर्जुन गुंड हे बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र आहेत. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी अर्जुन गुंड यांचे सुपुत्र आहेत. श्रीमती निर्मला नेताजी माने, जि.प. भंडारा, संघरत्न गोविंदराव सरोदे, शिक्षणाधिकारी, जि. प. अमरावती, पवन पंजाजी खंदारे शिक्षणाधिकारी, जि.प., गोंदिया या प्रमाणे नियुक्ती देण्यात आली आहे.





## केशरबाई भावले यांचे दुःखद निधन

**अंबड । प्रतिनिधी**



अंबड तालुक्यातील साष्टपिंपळगाव येथील केशरबाई हरिभाऊ भावले यांचे दिनांक १५ एप्रिल रोजी सायंकाळी ४ वाजता दुःखद निधन झाले असून त्यांचा अंत्यविधी रात्री उशिरा साष्ट पिंपळगाव येथील हिंदू स्मशानभूमी मध्ये करण्यात आला केशरबाई भावले ह्या मागील तीन ते चार वर्षापासून आजारी होत्या आतिशय मनमिळाऊ स्वभावाच्या होत्या दैनिक दुनियादारी चे पत्रकार सुरेश भावले व अँडव्होकेट सतीश भावले यांच्या त्या चुलती होत्या.त्यांच्या जाण्याने साष्ट पिंपळगवातील लोकांनी व पाहुणे मंडळींनी हळहळ व्यक्त केली.

# मुस्लीम तरूणाकडून मुलीवर बलात्कार, बुरखा घालण्याची केली जबरदस्ती

**जालना । प्रतिनिधी**

**आयटी कंपनीत नोकरी करणाऱ्या तरुणींनी प्रेमाच्या जाळ्यात ओढून बुरखा घालणे, बलात्कार आणि विशिष्ट धर्माविषयी द्वेष पसरवणारे रॅकेट समोर आल्यानंतर राज्यभर खळबळ उडाली. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी सुरू असतानाच जालना शहरात देखील अशाच प्रकारे प्रेमाच्या जाळ्यात ओढून तरुणीवर अत्याचार करण्यात आला आहे. तसेच बुरखा घालण्यास देखील मजबूर करण्यात आले. याप्रकरणी जिल्हा पोलीस प्रशासनाने तत्काळ दखल घेऊन याप्रकरणी कदिम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून आरोपीला न्यायालयात हजर केले असता २० एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.**




जालना शहरातील रेल्वे स्टेशन परिसरातील एका महाविद्यालयात आरोपी साहिल जावेद अन्सारी आणि पीडित तरुणी शिकत होते. सुरुवातीच्या कालावधीतच साहिल याने तरूणाला प्रेमाच्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न केला. मुलीने विरोध केल्याने आत्महत्या करण्याची धमकी दिली. यामुळे मुलीने अन्सारी सोबत मैत्री केली. या दरम्यान सोहेल पीडीतेला बुरखा घालून शहरात वेगवेगळ्या ठिकाणी फिरत आणि भेटत होता. घरी कोणी नसल्याचे सांगत घरी घेऊन गेला अन पीडीतेवर अत्याचार केला. ही बाब पीडीतेने आईला सांगितल्या नंतर आईसह पीडीतेने कदिम जालना पोलिसांत बलात्कार आणि जातीवाचक शिवीगाळ केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत.

# पाईप लाईनच्या वादातुन खून प्रकरणी चार आरोपींना जन्मठेपेची शिक्षा

**परतुर । प्रतिनिधी**

**कृष्णा गुणाजी धोंगडे याचा निर्माणषणे खून केल्या प्रकरणी कलम ३०२, १२० वी सह कलम ३४ भा.द.ली. अन्नगे जन्मठेपेनी शिक्षा व प्रत्येकी दहा हजार रूपये दंड तसेच दंड न भरल्यास १ वर्षे कारावासभी शिक्षा ठोठावली.**

आरोपी शंकर दगड्या पतंगे, वय २६ वर्ष, पाडुरंग नरहरी रोकडे, वय ३६ वर्षे, पवन नरहरी रोकडे, वय–२६ वर्ष ,नरहरी बापुराव रोकडे, वय ६० वर्ष सर्व रा. अंबा ता. परतुर, जि.जालना यांनी मगत नामे कृष्णा गुणाजी धोंगडे याचा निर्माणषणे खून केल्या प्रकरणी कलम ३०२, १२० वी सह कलम ३४ भा.द.ली. अन्नगे जन्मठेपेनी शिक्षा व प्रत्येकी दहा हजार रूपये दंड तसेच दंड न भरल्यास १ वर्षे कारावासभी या प्रकरणात सरकारपक्षातर्फे अतिरिक्त सरकारी वकील ॲड. सौ. जयश्री नारायण बोराडे यांनी काग पाहिले याबाबत सविस्तर माहिती अशी की भक्त कृष्णा गुणाजी धोंगडे हा दिनाक ०८/०८/२०२३ रोजी रात्री त्याने मेडीकलये दुकान बंद करून त्याव्या घरी जात असतांना वरील आरोपींनी शेतीच्या तरोच पाण्याच्या पाईपलाईनच्या वादाच्या कारणावरून कट रचुन संगमताने फावड्याच्या दाइयाने, कोयत्याने ब काठीने जबर मारहाण करून निर्वृणपणे खुन केला. फिर्यादी सागर गुणाजी धोंगडे यांच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन परतुर येथे गुन्हा कं. ३३१/२०२३ कलम ३०७, ३२६, ३४ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल होवुन त्यांनतर शश्वमी कृष्णा च्या मृत्यू नंतर सदर प्रकरणात कलम ३०२, १२० वी साह कलम ३४ भा.दं.वि. प्रमाणे कलम बाढ झाली. त्यांनतर संपुर्ण तपास झाल्यानंतर सदर गुन्हयात तपासीक अधिकारी श्री. एम. टी. सुरवसे, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन परतुर यांच्याकडून मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकार पक्षातर्फे सदर प्रकरणात एकूण १७ साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असलेली मयताची आई (फिर्यादी) व पत्नी, वैदयकिय अधिकारी, पंच तसेच इतर महत्वाचे साक्षीदार व तपासणीक अधिकारी श्री. एम. टी. सुरवसे यांच्या साक्षी महत्वाच्या ठरल्या. सरकारपक्षातर्फे दिलेला पुरावा व युक्तीवाद लक्षात घेवून मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश–०२. जालना मा. श्रीमती. एन. एस. शेख मॅडम यांनी सर्व आरोपींना मयत कृष्णा गुणाजी धोंगडे यांबा निघृणपणे खून केल्या प्रकरणी कलम ३०२, १२०–बी सह कलम ३४ भादवी मध्ये जन्मठेपेची शिक्षा व प्रत्येकी दहा हजार रूपये दंड तसेच दंड न भरल्यास १ वर्षे कारावासची शिक्षा ठोठावली. या प्रकरणात सरकारपक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. सौ. जयश्री नारायण बोराडे यांनी काम पाहिले. या प्रकरणात सरकारपक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. सौ. जयश्री नारायण बोराडे यांनी काम पाहिले व सदर प्रकरणामध्ये मा. पोलीस अधिक्षक श्री. अजयकुमार बन्सल , अप्पर पोलीस अधिक्षक श्री. आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग परतुर श्री.. आर. टी. रेंगे व सध्याचे पोलीस निरीक्षक श्री. भागवत सुदाम व कोर्ट पैरवी व जिल्हा सरकारी वकील कार्यालयातील कर्मचारी यांनी मदत केली.

## पान १ वरून...

### अवकाळीच्या संकटातून

विशेष भर राहणार आहे. जिल्हाधिकारी व संबंधित यंत्रणांना सतत परिस्थितीचा आढावा घेत आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. दरम्यान, प्रशासनानेही युद्धपातळीवर काम सुरू केले असून, बाधित भागांमध्ये मदत पोहोचवण्यासाठी यंत्रणा सक्रिय झाली आहे. शासनाच्या या निर्णयामुळे अवकाळीच्या संकटात सापडलेल्या शेतकरी व नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, पुनर्वसन प्रक्रियेला निश्चितच गती मिळणार आहे.

--------

### भोंदू खरात प्रकरणातील

धडकल्यानंतर बराच वेळ त्याच स्थितीत उभी होती. नंतर कुणीतरी ही माहिती पोलिस प्रशासनाला कळवली. त्यानंतर पोलिस व ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन जितेंद्र शेळके, त्यांची पत्नी अनुराधा व मुलाला कारमधून बाहेर काढले. पण तोपर्यंत जितेंद्र शेळक व त्यांच्या पत्नीचा मृत्यू झाला होता. हे तिघेही कारमध्ये बराच वेळ अडकले होते. मृत जितेंद्र शेळके भोंदू अशोक खरातचा अत्यंत जवळचे सहकारी होते. ते खरातच्या शिवनिका ट्रस्टवर उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. या प्रकरणाचा तपास करणा–या विशेष तपास पथकाने (एसआयटी) त्यांचा जबाबही नोंदवला होता. त्यांची जवळपास ४ वेळा चौकशी झाली होती. त्यामुळे ते या प्रकरणातील एक महत्त्वाचे साक्षीदार होते.

----------

### महिला आरक्षण घटनादुरुस्ती

यांनी संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयक, २०२६ नामंजूर झाल्याचे जाहीर केले. यानंतर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी इतर दोन विधेयके पुढे न नेण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्र सरकारकडून महिला आरक्षण लोकसभेत आणि विधानसभेत संविधान १३१ वी दुरुस्ती विधेयकात लोकसभेच्या जागा वाढवण्याचे प्रस्तावित केले आहे. २०२९ च्या निवडणुकीत लोकसभेच्या सध्याच्या ५४३ जागांमध्ये वाढ करुन राज्यातील लोकसभेच्या जागा ८१५ आणि केंद्रशासित प्रदेशांच्या जागा ३५ जागा मिळून ८५० जागा करण्याचा प्रस्ताव विधेयकात होता. सरकारचा महिला आरक्षणातील दुरुस्ती विधेयकासोबत लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेचे विधेयक मांडले होते. विरोधी पक्षांकडून नेमका याच मुद्याला आक्षेप होता. अमित शाह यांनी विरोधी पक्षांवर टीका करताना म्हटले की २०२३ मध्ये विरोधी पक्ष महिलांना आरक्षण देण्याचा शब्द दिले होते आता द्यायचा विषय आलेला असताना मागे हटत आहेत. महिला आरक्षण लटकवत आहात, तुम्ही निवडणुकीत जिथे जिथे जात असाल तिथे तुम्हाला या देशातील महिलांचा आक्रोश सहन करावा लागेल, असे अमित शाह म्हणाले. दरम्यान, विरोधी पक्षांकडून केंद्र सरकारचा महिला आरक्षण विधेयकासोबत परिसीमन विधेयक आणल्याने विरोधी पक्षांनी सरकारच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी सरकारने आणलेल्या विधेयकावर बोलताना, यापूर्वी महिला आरक्षण विधेयकाला सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी विरोध केल्याचे म्हटले होते. केंद्र सरकारला महिला आरक्षण लोकसभा आणि विधानसभेत लागू करायचे असेल तर ५४३ जागांमध्येच अंमलबजावणी करावी, अशी भूमिका प्रियांका गांधी यांनी मांडली. केंद्र सरकारचा लोकसभेची सदस्यसंख्या ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रयत्न वरवर पाहता यात आपत्ती वाटत नाही मात्र सखोलपणे विचार केल्यास यातील राजकीय हेतू लक्षात येतो, असे प्रियांका गांधी म्हणाल्या.

---------------

### चंद्रकांत पाटलांच्या वक्तव्यान

कॅबिनेट दर्जा हा शब्द लवकरात लवकर जावा अशी प्रार्थना करु आणि मंत्रीपद यावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. ते कदाचित सहकार पद त्याच्याकडे येई असे पाटील म्हणाले. अमितभाईंमुळे मी आधी आमदार नंतर मंत्री झालो, त्यांनीच मला पहिले सहकार खाते दिले. त्यावेळी माझ्याकडे साधी सहकारी संस्थाही नव्हती. त्यावर त्यांना मी विचारले मलाच सहकार खाते का? तर म्हणाले तुमच्या संस्था नाहीत म्हणूनच तुम्हाला सहकार खाते दिले, असा सहकार खात्याचा किस्सा चंद्रकांत पाटील यांनी सांगितला. आमदार सुनील कांबळे यांना सहकार सूत गिरणी मिळावी, यासाठी देवेंद्रजींनी संपत आलेली कॅबिनेट पुन्हा लांबवून त्यांची फाईल मंजूर करुन घेतली असे चंद्रकांत पाटील म्हणाले. विरोधक राज्य सरकार कर्जबाजारीपणाची कितीही टीका करत असले तरी परिस्थिती अजिबात तशी नाही. आपला जीडीपी खूप चांगला आहे. त्यामुळे तुमच्या महाराष्ट्र राज्य सहकारी संघाला जेवढा निधी लागेल, तो दिला जाईल तुम्ही फक्त प्रस्ताव पाठवा असे पाटील म्हणाले. राज्यात लवकरच वेगळे सहकार विद्यापीठ निर्माण तर करुच पण राज्यातील विविध विद्यापीठात सहकार नावाचे स्वतंत्र डिपार्टमेंटही निर्माण करु, असे चंद्रकांत पाटील म्हणाले.

------------

### आरोपी वाल्मिक कराडची प्रकृती

आली होती. दरम्यान, मुख्य आरोपी वाल्मिक कराड याची तब्येत अचानक खालावल्याची माहिती समोर आली आहे. बीड जिल्हा कारागृहात असताना त्याला अस्वस्थ वाटू लागल्याने प्रशासनाने तातडीने वैद्यकीय तपासणीसाठी त्याला जिल्हा रुग्णालयात हलवले. सध्या त्याच्यावर उपचार सुरू असून विविध वैद्यकीय चाचण्या करण्यात येत आहेत. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवले असून गरज भासल्यास पुढील उपचारासाठी त्याला आयसीयूमध्ये हलवण्याची तयारीही करण्यात आली आहे. त्याच्या प्रकृतीत अचानक बिघाड का झाला, कारागृहात नेमके काय घडले, याबाबत विविध चर्चा सुरू झाल्या आहेत. मात्र यासंदर्भात अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही. संतोष देशमुख हत्या प्रकरण हे बीड जिल्ह्यातील अत्यंत गाजलेले प्रकरण असून यामुळे संपूर्ण राज्याचे लक्ष या प्रकरणाकडे लागले आहे. दीड वर्षानंतरही या प्रकरणाची सुनावणी सुरू असल्याने न्याय मिळण्याची प्रतीक्षा कायम आहे.

-----------

### मस्साजोगची सरपंचपदाची

संजिवनी देशमुख, पंजाब देशमुख आणि करुणा देशमुख या तीन उमेदवारांनीच आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. तर, मागील सरपंचपदाच्या निवडणुकीत ९ मतांनी पराभूत होणारे स्वरूपानंद देशमुख यांनी आपला अर्ज कायम ठेवल्यामुळे ही निवडणूक होणार असल्याचे आज स्पष्ट झाले. या पोटनिवडणुकीसाठी २८ तारखेला मतदान प्रक्रिया पार पडणार असून २९ तारखेला निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे, आता, मस्साजोगचा सरपंच कोण होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

------------

### १ जूनपासून राज्यातील सर्व

स्वच्छतागृहावरच न थांबता, मंत्र्यांनी बस स्थानकावरील कॅन्टीनलाही भेट दिली. तिथे लावण्यात आलेल्या दर फलकाबाबत त्यांनी सविस्तर विचारणा केली. प्रवाशांची खाद्यपदार्थांच्या बाबतीत लूट होऊ नये, अशा सूचना त्यांनी यावेळी प्रशासनाला दिल्या.

-------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि.१८ एप्रिल २०२६


## थोडक्यात

### पाटोदा विभागात 'पोषण पंधरवाड्या'चे आयोजन; १९ अंगणवाड्यांचा संयुक्त उपक्रम

पाटोदा । प्रतिनिधी

बालकांचे आरोग्य आणि सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला '८ वा पोषण पंधरवडा' पाटोदा येथे उत्साहात साजरा केला जाणार आहे. बीड नागरी पश्चिम पाटोदा विभागातील १९ अंगणवाड्यांच्या संयुक्त विद्यमाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचा तपशील: दिनांक: सोमवार, २० एप्रिल २०२६

वेळ: दुपारी १:०० वाजता स्थळ: जाधव कॉम्प्लेक्स, हैदराबाद बँकेशेजारी, पाटोदा. प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन: या कार्यक्रमाला पाटोदा नगराध्यक्षा मा. सौ. दिपालीताई राजुभैया जाधव आणि पंचायत समिती सभापती मा. सौ. सुवर्णाताई लांबरुड यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच, महिला व बालविकास सभापती सौ. आरती गोरे, बालविकास प्रकल्प अधिकारी सौ. रेश्मा चिमणे, आणि बालरोग तज्ज्ञ डॉ. सुरज बांगर यांसह अनेक मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. आयुष्याच्या पहिल्या ६ वर्षांत मेंदूचा विकास जास्तीत जास्त करणे हा या पोषण पंधरवड्याचा मुख्य उद्देश आहे. लहान मुलांच्या योग्य पोषणाबाबत पालकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी पाटोदा विभागातील सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाला पाटोदा परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांमार्फत करण्यात आले आहे.

### शेतकऱ्यांनी तात्काळ नोंदणी करून फार्मर आयडी काढावा –प्रा. बबनराव आंधळे

बीड । प्रतिनिधी

केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार रासायनिक खताच्या वितरणात पारदर्शकता आणण्यासाठी फार्मर आयडी (ऋशी खऊ) प्रणाली राबवण्यात येत आहे. याशिवाय फार्मर आयडी असल्याशिवाय कोणत्याही शेतकऱ्याला रासायनिक खत मिळणार नाही. जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी शासनाच्या या उपक्रमास सहकार्य करून फार्मर आयडीची तात्काळ नोंदणी करावी जेणेकरून खत वितरण सुरळीत व पारदर्शकपणे होईल असे आवाहन ग्रामीण संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार व राज्य संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केले आहे फार्मर आयडी अनिवार्य शेतकऱ्यांना खत



खरेदीसाठी फार्मर आयडी काढणे बंधनकारक आहे फार्मर आयडी शिवाय खत वितरण केले जाणार नाही. अनुदानित खतासाठी सक्ती रासायनिक खतावरील अनुदानाचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी आवश्यक आहे खताचा काळाबाजार व अनावश्यक लिंकिंग रोखण्यासाठी ही प्रणाली प्रभावी ठरेल. पारदर्शक व नियोजनबद्ध वितरण सुनिश्चित होईल. डिजिटल नोंदणी प्रणाली शेतकऱ्याची माहिती (जमीन, पीक, योजना) डिजिटल स्वरूपात नोंदवली जाईल खत खरेदी करताना आयडी स्कॅन / क्रमांक वापरला जाईल. थेट लाभ हस्तांतरण खत अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होईल ही तर शासकीय योजनांसाठी फार्मर आयडी आवश्यक राहील जिल्ह्यात फार्मर आयडी नोंदणी मोहीम सुरू आहे. सर्व तालुक्यांमध्ये जनजागृती व नोंदणी शिबिर या आयोजित करण्यात येत आहेत फार्मर आयडी कसा काढावा ग्रामपंचायत कार्यालय सीएससी उडउ (कॉमन सर्विस सेंटर) सहाय्यक कृषी अधिकारी /कृषी विभाग कार्यालय शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी नोंदणी पूर्ण करावी खत खरेदी करताना आयडी सोबत ठेवावा अधिक विक्रेत्याकडूनच खत खरेदी करावे व बिल घ्यावे खरीप हंगाम २०२६ पासून हा नियम काटेकोरपणे लागू केला जाणार आहे याची शेतकऱ्याने दखल घ्यावी सहकारी संस्था व खाजगी विक्रेत्यामार्फत ही याच नियमानुसार खत वितरण होईल असे आवाहन ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे.

# आदित्य शिक्षण संस्थेत 'अनुभवातून शिक्षणा' चा जागर

बीड । प्रतिनिधी

केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव देऊन भविष्यातील उद्योजक घडवण्याच्या उद्देशाने आदित्य कृषी शाखेत राबवण्यात येत असलेल्या 'अनुभवातून शिक्षण' प्रकल्पाची विद्यापीठ प्रतिनिधींनी नुकतीच पाहणी केली. अंबाजोगाई कृषी महाविद्यालयाचे प्रतिनिधी डॉ. बी. एन. भोंडे यांनी या प्रकल्पाला भेट देऊन विद्यार्थ्यांच्या कौशल्याचे आणि महाविद्यालयाच्या नियोजनाचे विशेष कौतुक केले.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा आणि संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली





### विद्यापीठ प्रतिनिधींकडून उपक्रमाचे कौतुक

महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवले जातात. आठव्या सत्रातील विद्यार्थ्यांसाठी असलेल्या या विशेष प्रकल्पातून विद्यार्थ्यांना केवळ पदवीधर न बनवता, त्यांच्यात व्यावहारिक गुण निर्माण करून त्यांना सक्षम उद्योजक बनवण्यावर भर दिला जात आहे. या प्रकल्पांतर्गत विद्यार्थी केवळ वर्गात न शिकता प्रत्यक्ष प्रक्षेत्रावर आणि प्रयोगशाळेत घाम गाळत आहेत. यामध्ये कुक्कुटपालन आणि दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या प्रक्रियेचे तंत्रशुद्ध शिक्षण, सेंद्रिय शेतीच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या खत निर्मितीचे प्रात्यक्षिक त्यामध्ये मशरूम व गांडूळखत निर्मिती, शेतीचा कणा असलेल्या दर्जेदार बियाण्यांची निर्मिती प्रक्रिया, फळे काढणीनंतर त्यापासून विविध पेये आणि मूल्यवर्धित पदार्थ बनवण्याचे फळप्रक्रिया कौशल्य. विद्यार्थी आत्मसात करत आहेत. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांच्यासह डॉ. मोरे, डॉ. सातपुते, डॉ. ठोके, डॉ. खेडकर, डॉ. मुंडे, डॉ. येडगे, प्रा. गव्हाणे, प्रा. राऊत, प्रा. बोरडकर आणि प्रा. मिसाळ या विभागप्रमुखांनी व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना तांत्रिक मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे बीड जिल्ह्यातून भविष्यात सक्षम आणि उद्योजक कृषी पदवीधर बाहेर पडतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### शेतकऱ्यांनाही मिळते मार्गदर्शन

हा प्रकल्प केवळ विद्यार्थ्यांपुरता मर्यादित न राहता, परिसरातील शेतकरी वर्गासाठीही मार्गदर्शक ठरत आहे. शेतीला जोडधंद्याची जोड कशी द्यावी, उत्पन्नाचे स्रोत कसे वाढवावे आणि आर्थिक प्रगती कशी साधावी, याचे जिवंत उदाहरण या प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकऱ्यांसमोर उभे राहिले आहे.

हा प्रकल्प अत्यंत उपयुक्त आणि व्यावहारिक आहे. प्रत्यक्ष कामाच्या माध्यमातून दिले जाणारे हे प्रशिक्षण विद्यार्थ्यांच्या भविष्यातील करिअरसाठी निश्चितच दिशादर्शक ठरेल. आदित्य शिक्षण संस्थेने केलेले नियोजन वाखाणण्याजोगे आहे.

–डॉ. बी. एन. भोंडे, विद्यापीठ प्रतिनिधी

# विद्यार्थ्यांच्या सामर्थ्याची ओळख म्हणजे स्वयंशासन दिन -अंगद काकडे

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील पाचेगाव केंद्रांतर्गत असणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवट बोरगाव येथे इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंशासन दिनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक सामर्थ्याची ओळख करून देणारा दिवस म्हणजे स्वयंशासन दिन. या दिवशी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची विविध कौशल्य समोर येतात. त्यांची भीती दूर होते.असे प्रतिपादन पाचेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख अंगद काकडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

गेवराई तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळवट बोरगाव येथे इ. चौथीच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन शाळेचे मुख्याध्यापक शशिकांत कुलथे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. सकाळी या विद्यार्थी शिक्षकांनी सर्वप्रथम परिपाठ आयोजित केला. चौथीत असणाऱ्या या विद्यार्थ्यांनी शाळेतील इ. पहिली ते तिसरीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना अध्यापन करण्याचा अनुभव घेतला. यावेळी



### विद्यार्थ्यांनी घेतले प्रशासन व अध्यापनाचे धडे

**एक दिवस शाळा कशी चालवायची. याचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. यानिमित्त शाळेचा परिसर हा विद्यार्थी शिक्षकांनी गजबजुन गेला होता. शाळा भरल्यापासून ते शाळा सुटेपर्यंतची सर्व जबाबदारी एक दिवस या शाळा चालवणाऱ्या विद्यार्थी शिक्षकांनी सांभाळली. शालेय प्रशासन आणि शाळा वर्ग अध्यापनाचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून घेतला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक ते शिक्षक हे सर्व पद विद्यार्थ्यांनी भूषविले हे विशेष.**

विद्यार्थ्यांना इयत्ता पहिली ते तिसरीच्या वर्गातील सर्व विषयांचे अध्यापनाचे नियोजन करून देण्यात आले होते. वर्गनिहाय व विषयनिहाय विद्यार्थी शिक्षकांचे नियोजनाप्रमाणे तासिकांचे आयोजन करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक म्हणून प्रांजल गाडे तर पर्यवेक्षक म्हणून श्रावणी घोलप यांनी काम पाहिले. या उपक्रमामध्ये इयत्ता चौथीतील १६ विद्यार्थी विद्यार्थिनींनी प्रत्यक्ष अध्यापनाचा अनुभव घेतला.

स्वयंशासन दिनाच्या निमित्त या विद्यार्थी विद्यार्थिनींनी आपल्या मनातील कल्पना व विचार छोट्या विद्यार्थ्यांना अत्यंत प्रभावीपणे मांडल्या. यावेळी मार्गदर्शन करताना उपसरपंच रंगनाथ घोलप यांनी विद्यार्थ्यांना प्राथमिक शाळेत दिलेले शिक्षण म्हणजे भविष्यातील यशाचा पाया असतो. पाया जर मजबूत असेल तरच इमारत मजबूत होते. अशा शब्दात प्राथमिक शाळेचे महत्त्व विशद केले. तर शिवाजीअण्णा फौजी घोलप यांनी शालेय शिक्षणासोबतच देशभक्ती आणि राष्ट्रप्रेम याचे विद्यार्थी जीवनातील महत्त्व विशद करत. देशासाठी सैन्यामध्ये कार्य करण्याचे आवाहन केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अमोल गाडे, युवा नेते सतीशभैय्या गाडे, बेली तांडा जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक पंकज क्षीरसागर यासह शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांतर्फे शाळेसाठी भिंतीवरील घड्याळ भेट स्वरूपात देण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना सहभोजन देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक शशिकांत कुलथे यांनी तर सूत्रसंचालन व आभार शिक्षिका राधिका अंबिलवादे यांनी केले.

## पान ६ वरुन...

### पाटोद्यात ३ कोटींचा पूल

पुढारी आणि प्रशासनाचे दुर्लक्ष:

निवडणुकीच्या वेळी आश्वासनांची खैरात करणारे पुढारी आता या अर्धवट पुलाकडे ढुंकूनही पाहायला तयार नाहीत, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. कामाची पाहणी करून दोषी ठेकेदारावर कारवाई करण्याऐवजी प्रशासन या प्रकरणाकडे डोळेझाक करत असल्याचे चित्र दिसत आहे.

प्रमुख मागण्या:

पुलाच्या कामाची तातडीने चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई व्हावी. बाजार समितीसाठी महत्त्वाचा असलेला हा पूल तातडीने पूर्ण करण्यात यावा. निकृष्ट दर्जाच्या कामासाठी जबाबदार असलेल्या यंत्रणेकडून नुकसान भरपाई घ्यावी. वेळेत पावले उचलली नाहीत, तर हा अर्धवट पूल मोठ्या दुर्घटनेला कारणीभूत ठरू शकतो, असा इशारा स्थानिकांनी दिला आहे.

### मुंबईत १८ एप्रिलला

व्यक्त केला जाणार आहे. हा महायुवोत्सव युवकांना नवी ऊर्जा, प्रेरणा आणि दिशा देणारा ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या मेळाव्यास बीड जिल्हा सह मराठवाड्यातील युवासेना पदाधिकारी, युवासैनिक आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा युवासेना मराठवाडा विभागीय निरीक्षक विपुल बाळासाहेब पिंगळे यांनी दिली. मराठवाडा विभागातील जिल्हाभरात बैठका, नियोजन आणि जनजागृती मोहीम राबवून मोठ्या उपस्थितीसाठी तयारी सुरू आहे. बीड जिल्ह्यातील व मराठवाड्यातील युवकांमध्ये या महायुवोत्सवाबाबत मोठा उत्साह असून, गावागावांतून युवक सहभागी होण्यासाठी पुढाकार घेत आहेत. मोठ्या संख्येने सहभागी होऊन युवाशक्तीचा बुलंद आवाज राज्यभर पोहोचविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, गृहराज्यमंत्री योगेश कदम, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार धैर्यशील माने, खासदार ज्योतीताई वाघमारे यांच्यासह शिवसेनेचे मंत्री, वरिष्ठ नेते व पदाधिकारी उपस्थित राहून युवकांना मार्गदर्शन करणार आहेत. प्रगतीशील, सक्षम आणि युवकप्रधान महाराष्ट्र घडविण्यासाठी हा महायुवोत्सव एक ऐतिहासिक टप्पा ठरेल, असा विश्वास युवासेना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

### जातनिहाय जनगणनेत

विचारसरणीचा हात आहे . संपूर्ण देशामध्ये ५२ ते ७०% टक्के पेक्षा जास्त ओबीसीची लोकसंख्या आहे. भारतामध्ये ३००० पेक्षा जास्त जाती ओबीसी विभागात असून क्रिमिनल आट रद्द करून सामाजिक शैक्षणिक आर्थिक मागासलेपणा आधारावर वर्गीकरण करून जातनिहाय ओबीसी जनगणना करण्यात यावी. ओबीसी समाज जागा झाला तर राज्यातील व केंद्रातील सरकार निवडणुकीच्या माध्यमातून बदल होऊ शकतो अशी धास्ती भाजपच्या सरकारला असल्यामुळे ओबीसी वर सतत अन्याय केला जात असल्याचा आरोप काँग्रेसने नेते वसंत मुंडेंनी केला.

### पीक विम्यासाठी १ मे

कधी दुष्काळ अशा दुहेरी संकटात शेतकरी अडकतो. गेल्या वर्षीच्या पावसाच्या तांडवाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत जाहीर केलेला विमा तातडीने मिळणे अपेक्षित असताना प्रशासनाकडून होत असलेली दिरंगाई संतापजनक असल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. यासंदर्भात पोलीस अधीक्षक तसेच कृषी आयुक्त, पुणे यांनाही निवेदनाच्या प्रती देण्यात आल्या असून, प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा भाई गंगा भीषण थावरे यांनी दिला आहे.

### बीडमध्ये ५ ठिकाणी छापे

कॉम्प्लेक्स परिसरात कारमधून गुटखा साठा जप्त करण्यात आला.या सर्व आरोपींविरुद्ध बीड शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड), २०२३ च्या कलम १२३, २२३, २७४, २७५ आणि ३(५) अन्वये गुन्हा (रजि. नं. ८१/२०२६) दाखल करण्यात आला आहे.सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, उपनिरीक्षक महेश जाधव व त्यांच्या पथकाने यशस्वी केली.

पोलिसांचा इशारा: कोणत्याही टपरी चालकाने किंवा किराणा दुकानदाराने गुटखा विक्री करू नये, अन्यथा कडक कारवाई केली जाईल. नागरिकांनीही अशा अवैध प्रकारांची माहिती तात्काळ पोलिसांना द्यावी, असे आवाहन बीड शहर पोलिसांनी केले आहे.

### महिला सक्षमीकरणासाठी

म्हणून लागू झालेल्या या कायद्यामुळे, आता लोकसभा आणि राज्यांच्या विधिमंडळांमध्ये महिलांना ३३% आरक्षण मिळणार आहे. यामुळे महिलांच्या प्रगतीला यामुळे मोठी चालना मिळणार आहे.' . या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच विमल नाईकनवरे सरपंच संजीवनी शेंडगे डॉक्टर अर्चना मोरे डॉ अर्चना पवार छाया कुलकर्णी उपस्थित होत्या. याप्रसंगी तत्व ग्लोबल इंग्लिश स्कूलच्या संचालिका प्राध्यापिका स्नेहलता कुलथे माहेश्वरी समाजाच्या महिला मंडळाचे सचिव अनिता मुंदडा पल्लवी रत्नपारखी विभा उपाध्ये यांच्यासह विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार देखील करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कविता रत्नपारखी यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाजपाच्या माजलगाव शहर चिटणीस पूजा मुंडकर यांनी केले तर आभार प्रदर्शन भाजपा शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले.

# महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त महात्मा फुलेनगरात विविध कार्यक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या महात्मा ज्योतिराव फूले नगर येथे शिस्तबद्ध वातावरणात साजरी करण्यात आली.



यानिमित्त फुलेनगर च्या वतीने मुक व कर्नबधिर यांना खिचडी वाटप करण्यात आली.सायंकाळी खिचडी, अन्नदान व पाणी पाऊचही देण्यात आले.फुलेनगर मित्र मंडळाच्या माध्यमातून कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करूण ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी, मा.आमदार पृथ्वीराज साठे, अंबाजोगाई न.प. उपनगराध्यक्ष दिनेश भराडिया,माजी नगरसेवक कमलाकर आण्णा कोपले,नगरसेवक संजय गंभिरे, दिग्गविजय लोमटे, पत्रकार अभिजित लोमटे ,शेख फेरोज, रिपब्लिकन बहुजन सेनेचे जि.अध्यक्ष दयानंद लांडगे , सुरेश मिसाळ, मराठी पत्रकार परिषदेचे ता.अध्यक्ष बालाजी खैरमोडे, संपादक एसएस उदारे, नगर सेवक सचिन जाधव, किरण भालेकर,डॉ.इंगोले व ईतर मान्यवरांनी बाबासाहेबांच्या विचारांचे स्मरण केले.

याप्रसंगी 'बाबासाहेबांचे सामाजिक विचार आणि वर्तमान काळ' या विषयावर मा.आ. पृथ्वीराज साठे,सुरेश मिसाळ यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.यात अनेक विचारवंतांनी बाबासाहेबांच्या समतावादी विचारांवर प्रकाश टाकला. यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी यशस्वीपणे राजू बलाडे, कैलास वाघमारे, रोहित ढवारे , आदित्य गायकवाड , प्रविण जोगदंड, निलेश जोगदंड, रोहित वाघमारे, रूपेश वाघमारे, निखिल जोगदंड , गोविंद शिंदे ,आमर जोगदंड, प्रदिप थोरात,रवि मस्के ,सुरज पोटभरे, बबन वावळकर, धनराज जोगदंड, महेंद्र मस्के यांनी परिश्रम घेतले. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक,महिला आणि तरुण कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन पत्रकार मारुती जोगदंड यांनी केले, तर आभार साहेबराव लोंढे यांनी मानले.यावेळी नागरिक,महिला आणि तरुण कार्यकर्ते उपस्थित होते.



**अहिल्यानगर – राज्याचे कॅबिनेट मंत्री तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष मा. ना. छगनरावजी भुजबळ साहेब हे अहिल्यानगर येथील शासकीय विश्रामगृहावर आले असता त्यांचा सत्कार करताना महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाष राऊत.**



# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती १४ एप्रिल रोजी जिजामाता नर्सिंग अँड जिजामाता फिजिओथेरपी कॉलेजमध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला जिजामाता नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य विनोथ कुमार सर या अध्यक्ष स्थानी व जिजामाता फिजिओथेरपी कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर पॉल राज सर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रथम महामानवाच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला व अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी कॉलेजचे ऑफिस सुप्रीटेंडंट वाघ सर, शिंदे सर, इरफान पठाण सर व कॉलेजचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३०७ दिनांक-१५/०४/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती सायमा मुनाफ तांबोळी रा.ताडहदगाव ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या स्वत:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | सायमा मुनाफ तांबोळी | स्वत: | १०/०७/१९९४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-१५/०४ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय**

दुरध्वनी क्रमांक ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३०६ दिनांक-१५/०४/२०२६

अर्जदार श्रीमान/श्रीमती सारयाबी हिराजी शेख रा.ताडहदगाव ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या स्वत:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| | सारयाबी हिराजी शेख | स्वत: | ०६/०३/१९६८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-१५/०४ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

# खाण्यामुळे जनावरांना होते विषबाधा



पशुपालकांनो पावसाळा म्हटले की, चाऱ्याची काही चिंता पशुपालकांना सहसा नसते. कारण पावसाळ्यात हिरवा चारा मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतो मात्र बऱ्याचदा जनावरांकडून असा पाला किंवा वनस्पती खाल्ल्या जातात ज्या त्यांच्या जीवासाठी धोकादायक असतात.

या वनस्पतींच्या खाण्यामुळे विषबाधा पावसाळा ऋतूमध्ये अनेक वनस्पती सोबतच विषारी वनस्पती उदा. निळी फुली व माठ/काटेमाठ या देखील वाढतात. या वनस्पती पशुधनाच्या खाण्यामध्ये आल्यास विषबाधा होते. माठ/काटेमाठ खाण्यात आल्यास त्यातील नायट्रेटची विषबाधा होऊन श्वसन संस्थेवर परिणाम होऊन मृत्यू ओढवतो. निळीफुली ही वनस्पती खालल्यास किडणीवर परिणाम होतो म्हणून अशा वनस्पती खाण्यात येणार नाहीत याची दक्षता घ्यावी, व खाण्यामध्ये आल्यास तात्काळ औषधोपचार करावा.

पावसाळ्यात जनावरांना घातसर्पचा धोका : पावसाळयामध्ये पशुधनामध्ये घटसर्प हा विषाणूजन्य आजार एक घातक रोग आहे. या रोगामधील फुफुसाचा दाह (न्यूमोनिया) हा प्रकार जिवघेणा ठरतो. जनावरे अचानक आजारी पडणे, नाकावाटे श्वास घेण्यास त्रास होणे ही लक्षणे प्रामूख्याने आढळतात. वेळीच उपचार न केल्यास जनावर दगावण्याची भिती असते. मात्र पशुवैद्यकांच्या सल्ल्याने प्रतिजैविकाची वेळी मात्रा दिल्यास हा रोग बरा होतो. हा रोग होऊच नये म्हणून आपल्या जनावरांचे लसीकरण करता येईल.

पीपीआर या विषाणूजण्य रोगाचा प्रादूर्भाव : पावसाळयाच्या सुरुवातीस वाढत जातो. म्हणून या रोगावर उपलब्ध असलेल्या लसीचे तिन महिने व त्यावरील वयोगटातील शेळी-मेंढीच्या पिल्लांमध्ये लसीकरण करून घ्यावे. ही लस गर्भ धारण शेळी-मेंढी मध्ये करू नये.

पावसाळयात जनावरांची काळजी : पावसाळयामध्ये शक्यतो शेळ्या मेंढ्यांना उघडवे त्यामूळे त्यांना पावसाचा मार बसणार नाही आणि त्यांचे शरीर तापमान कमी होणार नाही. भिजल्यामुळे शेळ्या-मेंढ्यांना फुफ्फूसाचा दाह होण्याची शक्यता असते (थंड पाण्याच्या मारामूळे) तसेच दलदल जमीनीमूळे खूर सडण्याची समस्या उद्भवणार नाही. वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ३० ते ४० कि.मी.) राहून तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्यामुळे, जनावरांना उघडयावर सोडू किंवा बांधू नये. निवाऱ्याच्या ठिकाणी बांधावे व पावसात भिजणार नाहीत याची काळजी घ्यावी. पशूधनास खुले पाणी, तलाव किंवा नदीपासून दूर ठेवावे, ट्रक्टर आणि इतर धातूंच्या शेती अवजारांपासून दूर ठेवावे व पशुधनास झाडाखाली जमा होऊ देऊ नये.तसेच पाऊस चालू होण्याच्या वेळी झाडाच्या आडोशाला थांबू नये.


# पावसाळ्यात असे करा दुधाळ जनावरांचे संगोपन



पावसाळ्यामध्ये आर्द्रता तसेच जमिनीतील ओलसरपणा वाढायला लागतो. हे वातावरण वेगवेगळ्या प्रकारच्या जिवाणू आणि विषाणूंच्या वाढीकरिता अनुकूल असून, त्यामुळे जनावरांच्या प्रजनन संस्थेमध्ये अनेक विपरीत परिणाम दिसून येतात. उदा. जनावरे वारंवार उलटणे, गाभण न राहणे, माज न दाखवणे. असे दिसून येते. पावसाळ्यात गोठ्यामध्ये गोचीड, पिसवा, माश्या, डासांचे प्रमाण वाढायला सुरुवात होते. यांच्या प्रादुर्भावामुळे अनेक प्रकारचे आजार होण्याची शक्यता असते. जनावरांच्या पोटामधील जंत वाढायला सुरुवात होते, त्यामुळे दुधाळ जनावरांना, वेळोवेळी जंतनाशक देणे आवश्यक असते. आठवड्यातून एकदा संपूर्ण गोठयामध्ये जंतुनाशकाची फवारणी करावी. गोठ्याच्या भिंती, टणक पृष्ठभाग आणि गव्हाणी जाळून घ्याव्यात. पावसाळ्यात लसीकरण करावे. गोठ्यामध्ये ज्या ठिकाणी पावसाच्या पाण्याची गळती असेल त्याची त्वरित दुरुस्ती करावी. गोठ्यामधील दुर्गंधीयुक्त वातावरण असू नये याची दक्षता घ्यावी. पावसाळ्यात गोठ्यातील पृष्ठभाग ओला असेल, तर जनावर घसरून पडण्याची शक्यता असते. याकरिता गोठ्यातील जमीन कोरडी ठेवावी. जनावरांच्या खुरांची नियमित तपासणी करावी.

आहार व्यवस्थापन : चारा किंवा खाद्य साठवणूक स्वच्छ व हवेशीर ठिकाणी असावी. चारा साठवणूक असलेले ठिकाण ओले असेल तर पावसाळ्यामध्ये बुरशीचा प्रादुर्भाव दिसतो. बुरशीयुक्त खाद्य जनावरास दिल्यास आजार होतात, दुग्ध उत्पादन कमी होते, विषबाधा होते. गाभण जनावरांमध्ये गर्भपात होऊ शकतो. हिरवा व वाळलेला चाऱ्याचे योग्य संतुलन करावे. जनावरांना समतोल आहार देणे आवश्यक आहे. उदा. ५०० किलो वजनाच्या दुभत्या गाई, म्हशींसाठी २० ते २२ किलो हिरवा चारा, ५ ते ६ किलो कोरडा चारा आणि ६ ते ७ किलो पशुखाद्य (दुधाच्या प्रमाणात) द्यावे. पावसाळ्यात दुधाळ जनावरांमध्ये कासदाह दिसतो. हे टाळण्यासाठी दूध काढण्या अगोदर आणि नंतर, जंतुनाशक द्रावणांनी सड, कास स्वच्छ करावी. गाभण जनावरांना जास्त प्रमाणात हिरवा चारा दिल्याने मायांग बाहेर पडण्याचे प्रमाण वाढते. यासाठी समतोल आहार देणे आवश्यक आहे. दुधाळ गाई, म्हशींना दूध उत्पादनाचा ताण असतो. सोबतच वातावरणाचा ताण पडला, तर आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन प्रजनन प्रक्रिया आणि दूध उत्पादनावर वाईट परिणाम दिसून येतो. पावसाळ्यातील प्रजनन संस्थेविषयी आजार टाळण्यासाठी दुधाळ गाई, म्हशींची योग्य काळजी, गोठा स्वच्छता, निर्जंतुकीकरण, स्वच्छ पाणी आणि समतोल आहार देणे हे अतिशय आवश्यक आहे.

# चांगला भाव मिळणारा 'गुलाबी लसूण'



अवघ्या पाच महिन्याच्या कालावधीत येणाऱ्या गुलाबी लसणाला बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी आहे. परंतु मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असल्यामुळे या लसणाचे भाव वाढत चालले आहेत.

हायब्रीड लसणापेक्षा गावरान लसणाला ग्राहक पसंती दर्शवित आहेत, परंतु हे मिळणे अवघड झाले आहे. शेतकऱ्यांनी या गुलाबी लसणाच्या लागवडीकडे एक अधिक उत्पन्न मिळवून देणारे पीक म्हणून बघणे गरजेचे आहे. कारण अवघ्या पाच महिन्यांच्या कालावधीत एका एकरमधून जवळपास तीन क्विंटल उत्पादन अपेक्षित असते. शहरी भागासह ग्रामीण भागातील भाजी मंडईमध्ये गुलाबी रंगाचा लसूण पहावयास मिळत नाही. मोठा व चांगल्या प्रतिचा लसूण मिळाला तरी त्याचा भाव ३५० रुपये असतो. हा लसूण काही मोजक्या शेतकऱ्यांकडेच उपलब्ध असल्याचे दिसून येत आहे. काही नागरिक या लसणाला गावरान असे सुद्धा म्हणतात. दरम्यान, आठवडी बाजारपेठेत भाजीपाला नेहमीच मिळतो. पाण्याच्या उपलब्धतेनुसार फळ भाज्यांचे भाव कमी जास्त होत असतात; परंतु हायब्रीड ऐवजी गुलाबी रंगाच्या लसणाला नेहमीच मागणी असते. बीड जिल्ह्यात अत्यल्प प्रमाणात गुलाबी दिसणाऱ्या गावरान लसणाची लागवड केली जाते.

हवामान : या पिकास समशितोष्ण हवामान उपयुक्त असते. मात्र अति उष्ण व अति थंड हवामान या पिकास मानवत नाही. पिकाच्या वाढीच्या काळात ७५ सेमीपेक्षा जास्त पाऊस पडत असल्यास पिकाची वाढ चांगली होत नाही. दिवसाचे २५ ते २८ अंश सेल्सिअस व रात्रीचे १० ते १५ अंश सेल्सिअस तापमानात गढ्ढ्यांची चांगली वाढ होते. ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात केलेली लागवड अधिक उत्पादन देते. उशिरा लागवड केल्यास लसणाच्या कंदाचा आकार कमी होतो, वजन कमी भरते, परिणामी उत्पादनात घट होते.

जमीन : मध्यम खोलीच्या भरपूर सेंद्रिय खते घातलेल्या रेती मिश्रित कसदार तणविरहित जमिनीत पीक चांगल्या प्रकारे घेता येते. हलक्या प्रकारच्या जमिनी, चिकण मातीच्या जमिनी लागवडीस योग्य नसतात.सुधारित जाती : महाराष्ट्रामध्ये फुले नीलिमा, फुले बसवंत, गोदावरी, भीमा पर्पल या जाती असून या सर्वांचा रंग गुलाबी किंवा जांभळा असतो. गोदावरी वाणाचा स्वाद अगदी तिखट असून राहुरी विद्यापीठाने हे वाण विकसित केले आहे. लागवडीसाठी सुधारित जातीचे बेणे वापरावे.

आंतरपीक : लसूण पिकामध्ये वाफ्यांच्या वरंब्यावर कोबी, कोथिबीर किंवा मुळा इत्यादी कमी कालावधीच्या पिकांची लागवड करता येते. तसेच लसणाची आंतरपीक म्हणून ऊस, मिरची, फळबागांमध्येसुद्धा लागवड करता येते.

# जमिनीची नांगरट कधी आणि कशी करावी



नांगरटीचे उद्देश साध्य होण्यासाठी, पूर्वीचे पीक काढल्याबरोबर लगेच नांगरट करणे फायद्याचे ठरते. कारण यावेळी जमिनीत ओलावा असल्याने नांगरटीचे काम हलके होते, ढेकळे निघत नाहीत, नांगरट खोलवर होते, पूर्वीच्या पिकाचा पालापाचोळा, काडीकचरा जमिनीत गाडला जातो व जमिनीस सेंद्रिय पदार्थाचा पुरवठा होतो. रब्बी-उन्हाळी व हंगामातील पिके काढल्यानंतर म्हणजेच सर्वसाधारणपणे मार्चएप्रिल मध्ये त्वरित नांगरण्या कराव्यात. हलक्या जमिनी पीक काढण्याच्या वेळी घट्ट होतात म्हणून एप्रिल किंवा मे महिन्यात वळवाचा पाऊस पडल्यानंतर किंवा पावसाळ्याच्या सुरवातीला पहिला पाऊस पडल्यानंतरच नांगराव्यात.

जमिनीची नांगरट कशी किती खोल करावी : नांगरट नेहमी उतारास आडवी करावी. नांगराचे तास उतारास आडवे असल्याने पाणी सावकाश थबकत उताराच्या दिशेने पुढे जाते. त्यामुळे जमिनीत अधिक पाणी मुरायला वेळ मिळतो. येथे काही प्रमाणात पाणी अडवा पाणी जिरवा ही उक्ती साध्य होते. पाण्याच्या प्रवाहाचा वेग मंदावल्याने मातीचे बारीक कण सहजासहजी पाण्याबरोबर वाहून जात नाहीत.अवकाळी आणि वळवाच्या पावसाने होणारी जमिनीची धूप कमी होण्यास मदत होते.

जमिनीची नांगरट ही प्रामुख्याने जमिनीचा प्रकार,जमिनीचा उतार, तणांचा प्रकार व प्रादुर्भाव, स्थानिक हवामान ,पुढील हंगामात म्हणजे खरीप-रब्बीत घ्यावयाची पिके या सर्व गोष्टींचा विचार करूनच नांगरट किती खोल करावी हे ठरवावे. खोल जाणाऱ्या पिकांच्या मुळ्या करीता खोल नांगरट व उथळ मुळ्यांच्या पिकांसाठी उथळ नांगरणी करणे जरुरीचे आहे. शिवाय प्रत्येक वर्षी शेतजमीन एकाच खोलीवर नांगरू नये,कारण त्यामुळे ठराविक खोलीवर एक टणक असा घट्ट थर तयार होतो,त्याला तवा धरणे असे म्हणतात.तो तवा फोडला नाही तर पिकाच्या मुळ्या , त्या थरात शिरकाव करत नाहीत अशा थरातून पाणी मुरण्यास आणि निचरा होण्यास वेळ लागतो. हंगामात घ्यावयाच्या पिकानुसार, नांगरटीची खोली ठरवावी. सर्वसाधारणपणे ऊस, बटाटा, आले, भाजीपाला इत्यांदी बागायती पिकांसाठी जमिनीची १५ ते २० से.मी खोल नांगरट करणे आवश्यक आहे, ज्वारी, बाजरी, गहू, भुईमुग या पिकांसाठी जमिन १० ते १५ से.मी. खोल नांगरावी

प्रत्येक जमिनीची दर वर्षी नांगरट करावी असे नाही .आपल्या जमिनीच्या आणि आपण घेणाऱ्या पिकाच्या गरजेनुसार ही मशागत करण्याची गरज आहे ,त्याकरिता त्या जमिनीवरील मागील पीक ,पुढे घ्यावयाचे पीक ,जमिनीचा प्रकार आणि हवामान इत्यादीवर अवलंबून असते. ज्या जमिनीत हरळी,कुदा वा लव्हाळा यासारख्या खोल मुळे असलेल्या तणांचा उपद्रव नसेल त्या ठिकाणी दर तीन वर्षांनी एकदा नांगरट करावी.तूर,कापूस ,सूर्यफूल यासारख्या पिकांच्या मुळ्या ,धसकटे जमिनीत खोलवर गेल्याने कुळवाच्या पाळीने निघणे शक्य होत नाही अशा ठिकाणी नांगरट अत्यावश्यक ठरते.

कोरडवाहू क्षेत्रातील जमिनीची नांगरट केंव्हा करावी ?: कोरडवाहू भागातील जमिनी ह्या काळ्या आणि भारी असून बेसाल्ट या अग्निजन्य खडकापासून बनलेल्या आहेत.अशा जमिनीत चिकणमातीचे प्रमाण ६० टक्क्यापेक्षा जास्त असते ,तसेच जमिनीची खोली ६० ते ९० से.मी. पर्यंत असते. या जमिनीतील ओल कमी होताच,मोठ्या प्रमाणावर त्यास भेगा पडतात आणि कठीण बनतात.या जमिनीची नांगरट प्रत्येक वर्षी केल्याने जमिनीच्या कण रचनेवर विपरीत परिणाम होतो.जमिन प्रमाणापेक्षा जास्त पोकळ राहते.ज्वारी, बाजरी यासारख्या लहान आकाराच्या बियाणे असणाऱ्या पिकांची उगवण शक्ती होत नाही. कारण बी, माती आणि पाणी यांचा संपर्क तसेच जमिनीतील ओलावा आणि तापमानाचा एकत्रित परिणाम उगवण शक्तीवर होतो,म्हणून अशा भारी काळ्या जमिनीची तीन वर्षातून एकदाच नांगरट करावी.

हलक्या जमिनीची नांगरट : हलक्या म्हणजे २५ ते ३० से,मी आणि तांबड्या जमिनी मध्ये खोल नांगरट फायद्याची दिसून येते .कारण जमिनीच्या खालच्या थरातील कठीणपणा कमी केला जातो ,त्यामुळे जमिनीत पाणी मुरण्याचा वेग वाढविला जातो आणि जमिनीत जास्त प्रमाणात पाणी मुरते .हलक्या जमिनी पीक काढण्याच्या वेळी घट्ट होतात म्हणून एप्रिल किंवा मे महिन्यात वळवाचा पाऊस पडल्यानंतर किंवा पावसाळ्याच्या सुरवातीला पहिला पाऊस पडल्यानंतरच नांगराव्यात.




## महत्वाच्या घटना

१९३५ : सन म्युंग मूनला येशू ख्रिस्ताने स्वप्नात साक्षात्कार दिला व आपण सुरु केलेले कार्य पुढे नेण्याची आज्ञा केली.
१९४१ : दुसरे महायुद्ध युगोस्लाव्हियाने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९४६ : सिरीयाने फ्रान्सकडून स्वातंत्र्य मिळवले.
१९५० : बॅ. मुकुंदराव जयकर पुणे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू झाले.
१९५२ : पहिली लोकसभा अस्तित्त्वात आली.
१९७० : चांद्रयान अपोलो १३तील अंतराळवीर सुरक्षितपणे पृथ्वीवर परतले.
१९७१ : द पीपल्स रिपब्लिक ऑफ बांग्लादेशची स्थापना झाली.
१९७५ : ख्मेर रुजने कंबोडियाची राजधानी नॉम पेन्ह जिंकली.
१९८० : 'अपोलो-१३' हे अंतराळयान चांद्रमोहीम अर्ध्यावर सोडून सुखरुप पृथ्वीवर परतले.
१९८३ : भारतीय अवकाश संशोधन संस्थेने उपग्रह प्रक्षेपण वाहन(रॉकेट) 'एसएलव्ही३' चे प्रक्षेपण केले.
१९९३ : एसटीएस-५४ हे संशोधक अंतराळयान सुखरूप पृथ्वीवर परतले.
२००१ : अफवांच्या अर्थशास्त्राचा सिद्धांत मांडणारे मॅसेच्युसेट्स इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी मधील अर्थशास्त्रज्ञ प्रा. अभिजित बॅनर्जी यांना पहिला 'माल्कम आदिशेषय्या पुरस्कार' जाहीर

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७९ : कवी सूरदास, हिंदीतील एक थोर कवी व श्रेष्ठ कृष्ण भक्त.
१८२० : बेसबॉल चे जनक अलेक्झांडर कार्टराईट यांचा जन्म. (मृत्यू: १२ जुलै १८९२)
१८३७ : जे. पी. मॉर्गन अमेरिकन सावकार (मृत्यू: ३१ मार्च १९१३)
१८९१ : यशवंत रामकृष्ण दाते कोशकार. चिं. ग. कर्वे यांच्या साहाय्याने त्यांनी 'महाराष्ट्र मंडळ कोश' स्थापन करून आठ खंडांचा 'महाराष्ट्र शब्दकोश' तयार केला. (मृत्यू: २१ मार्च १९७३)
१८९७ : निसर्गदत्त महाराज अद्वैत तत्त्वज्ञानी (मृत्यू: ८ सप्टेंबर १९८१)
१९१२ : भारतीय कादंबरीकार आणि मल्याळम साहित्याचे लघुकथा लेखक थकाझी शिवसंकरा पिल्लई यांचा जन्मदिन.
१९१६ : सिरीमाओ बंदरनायके श्रीलंकेच्या ६ व्या व जगातील पहिल्या महिला पंतप्रधान. त्यांचे पती श्रीलंकेचे व दुसरे पंतप्रधान सॉलोमन बंदरनायके यांच्या हत्येनंतर त्या पंतप्रधान झाल्या. त्यांनीच देशाचे 'सिलोन' हे नाव बदलून 'श्रीलंका' केले. खाजगी शाळा, तेलमंपन्या रबराचे मळे व चहाचे मळे यांचे त्यांनी राष्ट्रीयीकरण केले. (मृत्यू: १० आक्टोबर २०००)
१९४३ : भारतीय इतिहासकार व प्राध्यापक डॉ. एन. एन. नामपोथीरी यांचा जन्मदिन.
१९५१ : बिंदू चित्रपट अभिनेत्री
१९६१ : गीत सेठी बिलीयर्डसपटू
१९७२ : मुथैय्या मुरलीधरन श्रीलंकेचा क्रिकेटपटू
१९७७ : दिनेश मोंगिया क्रिकेटपटू

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९० : बेंजामिन फ्रँकलिन, विजेच्या शक्तीविषयी महत्त्वाचा शोध लावणारे अमेरिकेतील थोर शास्त्रज्ञ.
१८८२ : फ्लश टॉयलेट चे शोधक जॉर्ज जेनिंग्स यांचे निधन. (जन्म: १० नोव्हेंबर १८१०)
१९४६ : व्ही. एस. श्रीनिवासशास्त्री कायदेतज्ञ, सूक्ष्मबुद्धीचे राजकारणी, भारत सेवक समाजाचे अध्यक्ष आणि इंग्रजी वक्ते (जन्म: २२ सप्टेंबर १८६९)
१९७५ : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन भारताचे दुसरे राष्ट्रपती, पहिले उपराष्ट्रपती आणि तत्त्वज्ञ, त्यांच्या गौरवार्थ त्यांचा जन्मदिन हा भारतात 'शिक्षक दिन' म्हणून ओळखला जातो. (जन्म: ५ सप्टेंबर १८८८)
१९९७ : बिजू पटनायक ओरिसाचे मुख्यमंत्री, केन्द्रीय पोलाद, खाणकाम आणि कोळसा मंत्री (जन्म: ५ मार्च १९१६)
१९९८ : चित्रपट निर्माते विजय सिप्पी (वय ५५) यांचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू (जन्म:)
२००१ : डॉ. वामन दत्तात्रय तथा 'वा. द.' वर्तक वनस्पतीशास्त्रज्ञ व देवराई अभ्यासक (जन्म: १९ आक्टोबर १९२५)
२००४ : सौंदर्या कन्नड, तामिळ, तेलगू, मल्याळम आणि हिन्दी चित्रपट अभिनेत्री (जन्म: १८ जुलै १९७२)
२००५ : भारतीय राज्य उत्तरप्रदेश आणि हिमाचल प्रदेशाचे माजी राज्यपाल विष्णू शास्त्री यांचे निधन.
२०११ : विनायक आदिनाथ तथा 'वि. आ.' बुवा विनोदी साहित्यिक (जन्म: ४ जुलै १९२६)
२०१२ : वसंत दिवाणजी, कन्नड साहित्यात मौल्यवान योगदान देणारे प्रतिभावंत लेखक.

# जालना शहरात नारी शक्ती वंदन या कायद्यास भव्य रॅली काढून समर्थन

जालना। प्रतिनिधी

नरेंद्र मोदी सरकारने केलेल्या 'नारी शक्ती वंदन अधिनियमा'च्या समर्थनार्थ आज दि. १६ रोजी गुरुवारी सकाळी ९.०० वा जालना मामाचौका मध्ये एकत्रित होऊन नरेंद्र मोदी सरकारने ने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत करण्यासाठी सर्व महिला एका ठिकाणी येऊन केंद्र सरकारच्या समर्थनार्थ घोषणाबाजी व नारेबाजी करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाचा जयघोष केला. त्या नंतर महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा शुभांगीताई देशपांडे, महापौर वंदना मगरे, संगीताताई गोरंटया, नगरसेविका सुशीला दानवे, पूनम स्वामी या प्रमुख महिला पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात भव्य रैलीचे आयोजन करून रैली मामाचौक-सावरकर चौक-अलंकार चौक-महावीर चौक ते परत मामा चौक या ठिकाणी येऊन रैली चा समारोप करण्यात आला. या रैली मध्ये जालना शहरातील महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून महिलांनी हातात विधेयकाच्या समर्थनाचे फलक घेऊन केंद्र सरकारचे आभार व्यक्त केले. यावेळी फुगड्या




खेळून नारी शक्ती वंदन विधेयकाचा विजय असो'' पंतप्रधान नरेंद्र मोदींचे आभार'''"महिला सक्षमीकरण - देशाची प्रगती'' नारी शक्ती वंदन चा विजय असो, नारी शक्ती की पुकार सिर्फ मोदी सरकार, दिला नारी शक्तीला सन्मान मोदीजींचा आम्हाला अभिमान अशा घोषणा देण्यात आल्या. रॅलीत केवळ राजकीय कार्यकर्त्याच नव्हे, तर बचत गटातील महिला, महाविद्यालयातील विद्यार्थिनी, विविध स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधी आणि गृहिणी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

यावेळी मार्गदर्शन करताना भास्कर आबा दानवे म्हणाले की, नरेंद्र मोदी सरकारने घेतलेला ३३% आरक्षणाचा निर्णय हा महिलांच्या सन्मानाचा आणि त्यांच्या अधिकारांचा विजय आहे. या निर्णयामुळे महिलांना राजकारणात नेतृत्व करण्याची मोठी संधी मिळणार असून, देशाच्या विकास प्रक्रियेत त्यांचा सहभाग अधिक बळकट होईल. महिलांचे विचार, अनुभव आणि दृष्टिकोन शासन व्यवस्थेत समाविष्ट झाल्यास अधिक समतोल आणि सर्वसमावेशक निर्णय घेता येतील.


हा निर्णय भारताला अधिक प्रगत आणि सक्षम राष्ट्र बनविण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे, महिलांना ३३% आरक्षण मिळाल्यामुळे त्यांना राजकारणात पुढे येण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. या निर्णयामुळे महिलांचे सक्षमीकरण अधिक वेगाने होईल आणि समाजात त्यांचा सन्मान वाढेल. महिलांनी आता पुढे येऊन नेतृत्व स्वीकारणे गरजेचे असून, देशाच्या विकासात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे त्यांनी आवाहन केले. या रॅलीचे आयोजन शुभांगी देशपांडे यांनी केले. यावेळी त्या म्हणाल्या की, मोदी सरकारने महिलांना राजकारणात समान हक्क व संधी मिळवून देण्यासाठी ३३% आरक्षणाचा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या निर्णयामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढून त्या अधिक सक्षमपणे समाज व देशाच्या विकासात योगदान देतील. भविष्यात निर्णय प्रक्रियेत महिलांची भूमिका अधिक प्रभावी होणार आहे. यावेळी उपमहापौर राजेश राऊत, अशोक पांगारकर, विजय कामड, धनराज काबलिये, महेश निकम, अमोल धानुरे, वसंत शिंदे, शिवप्रकाश चितळकर, , पार्वताबाई देशमाने, शकुंतला वाघ, मंदाबाई मुंगसे, राधाबाई सासणे, आकाश देशमाने, आदित्य बोराडे, पुष्पा मेहेत्रे, वैशाली बनसोडे, इत्यादी प्रमुख मान्यवर नगरसेवकांसह जालना शहरातील महिला भगिनी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर बालविवाह प्रतिबध करा- जिल्हाधिकारी मित्तल

जालना। प्रतिनिधी

अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर १९ एप्रिल रोजी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर विवाह सोहळे पार पडणार आहेत. मात्र, या मुहूर्ताचा गैरफायदा घेऊन बालविवाह उरकले जाण्याची शक्यता लक्षात घेता, जिल्हा प्रशासकीय यंत्रणा हायअलर्टवर आली आहे. जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी याबाबत सर्व संबंधित विभागांना सतर्कतेचे आदेश दिले असून, बालविवाहाचा प्रयत्न केल्यास कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवर विशेष पथके तैनात करण्यात आली आहेत. ग्रामीण भागात ग्रामसेवक, तर नागरी भागात बालविकास प्रकल्प अधिकारी हे बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून चोवीस तास कार्यरत राहणार आहेत. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आर. व्ही. कड यांनी स्पष्ट केले की, बालविवाहाची तयारी सुरू असल्याची कुणकुण लागताच



नागरिकांनी तत्काळ प्रशासनाला कळवावे. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार, विवाहासाठी मुलीचे वय १८ वर्षे आणि मुलाचे वय २१ वर्षे पूर्ण असणे बंधनकारक आहे. यापेक्षा कमी वयात विवाह केल्यास दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा, १ लाख रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा एकाच वेळी होऊ शकतात. बालविवाहाची माहिती देणाऱ्या नागरिकांची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल. चाईल्ड हेल्पलाईन १०९८, पोलीस नियंत्रण कक्ष ११२, इतर कार्यालये जवळचे पोलीस स्टेशन, ग्रामपंचायत, पंचायत समिती किंवा जिल्हा बालसंरक्षण कक्षाशी संपर्क साधावा. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीत कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप!

### सहकार पणन वस्त्रोद्योग जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी दिले चौकशीचे आदेश !

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याची लेखी तक्रार निर्भय महाराष्ट्र पार्टीचे कार्यकर्ते गोरक्ष ढाकणे यांनी सहकार पणन वस्त्रोद्योग संचलनालय जिल्हा उपनिबंधक अहिल्यानगर मंगेश सुरवसे यांच्याकडे केली होती याची गंभीर दखल घेत सहकार आणि पणन वस्त्रोद्योग जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याचे लेखी आदेश पारित केले असून पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीतील गैरव्यवहार व भ्रष्टाचार व त्याचा स्वयंस्पष्ट अहवाल मागवला आहे पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चेअरमन व काही संचालकांनी मनमानी कारभार करत पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीला घाट्यात आणले असून शेतकऱ्यांची कामधेनू असलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीत कोट्यावधी रुपयांचा घोटाळा केला आहे असा आरोप गोरक्ष ढाकणे यांनी केला आहे पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत बेकायदेशीर भूखंड वाटप करणे गाळे भाड्यातील पावत्यातील घोटाळा मुरूम न टाकता बिले काढणे कांदा शेड मधील घोटाळा पाथर्डी व तिसगाव बाजार समिती इमारत बांधकाम घोटाळा भूखंड वाटप करताना महाराष्ट्र शासन सहकार पणन संचालकांचे नियम पाळले नाहीत बाजार समितीत शेतकऱ्यांच्या आलेल्या मालाची नोंद न ठेवता बेकायदेशीर हप्ते वसुली केली जात आहे या सर्व गैरव्यवहाराची स्पेशल ऑडिट करून चौकशी करण्याची मागणी गोरक्ष ढाकणे यांनी केली आहे.

महाराष्ट्र शासन सहकार पणन व वस्त्रोद्योग संचालनालय यांचे अधिनियमन१९६३/१९६७ अन्वये जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीतील बेकायदेशीर गैरव्यवहार व भ्रष्टाचार याची चौकशी करून अहवाल मागवला आहे त्यानुसार कायदेशीर कारवाई केली जाईल -मंगेश सुरवसे जिल्हा उपनिबंधक

## सीबीएसई बोर्डच्या दहावी परीक्षेत स्वानंद हिरवे यांचे सुयश

जालना । प्रतिनिधी



जालना- २०२६ या वर्षीच्या सीबीएसईच्या दहावीच्या जाहीर झालेल्या निकालात जालना येथील ऋषी विद्यालय खरपुडीचा विद्यार्थी स्वानंद श्रीपाद हिरवे जालना याने ९०.६० % गुण घेऊन यश मिळविले आहे त्यांच्या या यशाबद्दल शाळेचे शिक्षक नातेवाईक व परिसरात सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

## नूतन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी कार्यभार स्वीकारला

छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर विभागाचे नूतन विभागीय आयुक्त म्हणून जी. श्रीकांत यांनी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्याकडून आज पदभार स्वीकारला. श्री. पापळकर यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तसेच पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी, अपर आयुक्त प्रताप काळे, अपर आयुक्त डॉ. अनंत गव्हाणे, अपर आयुक्त दादासाहेब वानखेडे, अपर आयुक्त सुषमा देसाई, अपर आयुक्त मंजुषा मिसकर, सहआयुक्त राजेश काटकर, सहायक आयुक्त मंजुषा कापसे, सहआयुक्त देविदास टेकाळे, उपायुक्त सविता हरकर, महानगर नियोजनकार हर्षल बाविसकर, उपमहानगर नियोजनकार रवींद्र जायभाये, सहायक आयुक्त शुभांगी आंधळे, उप मुख्य लेखाधिकारी साधना बांगर यांच्यासह प्रादेशिक विभागप्रमुख उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्री. श्रीकांत यांनी विभाग प्रमुखांशी संवाद साधत मराठवाड्यातील शेती, टंचाईस्थिती तसेच सामाजिक विषय व प्रशासकीय विषयाबाबत माहिती जाणून घेतली. सर्वांनी समन्वयाने काम करून विकास साधूया, असे आवाहन त्यांनी केले.छत्रपती संभाजीनगर विभाग हा सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचा विभाग असून, पर्यटन विकासाला चालना देतानाच शिक्षण, आरोग्य, महत्वपूर्ण उपक्रम व रोजगाराभिमुखतेवर भर देण्यात येईल, असे त्यांनी नमूद केले. तसेच विभागाला सर्वांगिण विकासाच्या दिशेने नेऊन राज्यात अग्रस्थानी आणण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासोबतच कामकाजात तंत्रज्ञानाचा अधिक वापर करून ई-ऑफिस प्रणालीचा १०० टक्के अवलंब करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशासकीय कामकाजात अंतर्गत समन्वय अत्यंत महत्त्वाचा असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

## बीड जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारीविरोधात कृती समितीचे निवेदन

### निनावी पत्रप्रकरणी कठोर कारवाईची मागणी; जिल्हा बदनामीचे षडयंत्र

बीड

बीड जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, जाळपोळ प्रकरणांसह गंभीर गुन्ह्यांवर ठोस कारवाई करण्याची मागणी बीड जिल्हा कृती समितीने पोलिस अधीक्षक यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. तसेच निनावी पत्रांच्या माध्यमातून प्रशासनाविषयी अविश्वास निर्माण करण्याच्या प्रकारावर तातडीने कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

गेल्या अडीच वर्षांपासून जिल्हा सामाजिक अस्वस्थतेच्या छायेत वावरत असून, जाळपोळ प्रकरणांमध्ये अपेक्षित ती प्रभावी कारवाई झालेली दिसून येत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढीस लागली आहे. दरम्यान, अलीकडील काळात खून, दरोडे, अत्याचार यांसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण



झाला आहे. या पार्श्वभूमीवर गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय, निनावी पत्रांच्या माध्यमातून समाजात भीती व संभ्रम निर्माण करण्याचा प्रकार वाढत असल्याचे निदर्शनास आणून देत, अशा प्रकरणांचा तांत्रिक पद्धतीने तपास करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, असे निवेदनात म्हटले आहे. जिल्ह्याची जाणीवपूर्वक बदनामी करण्याचे षडयंत्र रचले जात असल्याची शक्यता व्यक्त करत, जाळपोळ व इतर गंभीर गुन्ह्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, तसेच जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी बीड जिल्हा कृती समितीच्या वतीने करण्यात आली. या निवेदनावर डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर), रामनाथ खोड, शेख युनुस, माजी सैनिक अशोक येडे, बाळासाहेब मोरे पाटील, रामधन जमाले, सय्यद सादेक, सुहास जायभाये, किष्किंधा पांचाळ आदींची नावे आहेत.

**जाहीर प्रगटन**

**मा. के. सी. गाने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात बीड, ता.जि. बीड**

**किरकोल दियाणी अर्ज क्रमांक १०३/२०२०**

CNR No. MHBI0200003252026

**(मार्फत अ‍ॅड. बी. एन. तावरे)**

**मैना प्रभाकर जोगदंड वि. निरंक**

अर्जदार :- १. मैना भ्र. प्रभाकर जोगदंड, वय ७२ वर्षे, धंदा-घरकाम, रा. देवीबामुळगांव, ता. जि. बीड,२. संतोष पि. प्रभाकर जोगदंड, वय-४७ वर्षे, धंदा नौकरी, रा. देवीबाभुळगांव ता. जि. बीड, ३. देवराज पि. प्रभाकर जोगदंड, वय-४० वर्षे, धंदा-नौकरी, रा. देवीबाभुळगांव ता. जि. बीड ह. मु. दिनालालसिंग चाळ, कुर्ला पाईपलाईन्स, सत्यानगर न्यु गणेश दीर साकीनाका, मुंबई -४०००७२

विरुध्द निरंक मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत. वरील अर्जदार क्र. १ ते ३ यांनी या न्यायालयात प्रभाकर पि. नामदेव जोगदंड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत प्रभाकर पि. नामदेव जोगदंड यांचा मृत्यु दिनांक ०९/०१/२०२६ रोजी झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच मयताचे आई-वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत प्रभाकर पि. नागदेव जोगदंड यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रकरणातील पुढील तारीख ०९/०६/२०२६

आज दिनांक १६ माहे एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन,

**स्वाक्षरित** **लिपीक**

**स्वाक्षरित** **अधिक्षक**

सह दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

# भूमीअभिलेख कार्यालयातील,सावळे,पुसदकर मोरे यांच्यावरील चौकशीचा फास आणखी घट्ट

### भालगाव येथील पांडुरंग घुले शेतजमिनीत अतिक्रमण आणि मोजणी फेरफार प्रकरण

पाथर्डी। प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील भालगाव येथील पीडित शेतकरी पांडुरंग मायनजी घुले व त्यांचे दोन मुलं हरी पांडुरंग घुले वसंत पांडुरंग घुले या बंधूंच्या शेतजमीन गट नंबर ४२४ ४२५ व ३९१ शेतजमिनीत (वहिवाट आणि बांध) सामनेवाले एकनाथ घुले यांच्यात शेतजमीनमोजणी वरून वाद आहे यासंदर्भात पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन उपअधीक्षक निखिल मोरे दिनेश पुसदकर सुनील साळवे यांच्या भ्रष्ट कारभारामुळे वसंत घुले आणि हरी घुले यांच्या शेतजमिनीमध्ये एकनाथ घुले यांनी वहिवाटीत अतिक्रमण केले असल्याची तक्रार थेट महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे त्याअनुषंगाने बनावट दस्तावेज तयार करून मोजणीत फेरफार केल्याप्रकरणी पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन कर्मचारी निखिल मोरे व विद्यमान कर्मचारी दिनेश पुसदकर व सुनील सावळे यांचे निलंबन करण्याची मागणी आहे अहिल्यानगर भूमिअभिलेख जिल्हा अधीक्षक संजय कुंभार यांनी भ्रष्ट कर्मचारी निखिल मोरे दिनेश पूसदकर व सुनील सावळे यांच्यावर कारवाई करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले असून भूमीअभिलेख उपअधीक्षक नेवासा यांना लेखी आदेश काढून २४ एप्रिल २०२६ च्या आत चौकशीचा अहवाल मागवला आहे.

पाथर्डी भूमीअभिलेख कार्यालयातील तत्कालीन उपाधीक्षक निखिल मोरे दिनेश पुसदकर व सुनील साळवे यांनी लाखो रुपयांची आर्थिक देवाणघेवाण करून संगनमताने भालगाव येथील शेतकरी पांडुरंग मायनजी घुले त्यांचे मुलं वसंत घुले व हरी घुले यांच्या शेतजमीन गटनंबर ३९१ ४२४ व ४२५ जमीन मोजणीमध्ये २०/१२/२०२४ २०/०६/२०२५ तारखेला केलेल्या हद्दीखुणा २०/३/२०२६ रोजी केलेल्या हद्दीखुणा गट नंबर ३९१ मध्ये कायम मोजणी सीट व पोटहिस्सा यामध्ये सुद्धा प्रचंड तफावत जाणवत आहे.

पाथर्डी भूमिअभिलेख कार्यालयातील भ्रष्ट कर्मचारी निखिल मोरे दिनेश पुसदकर व सुनील साळवे यांनी पीडित शेतकरी मायनजी घुले यांच्या शेत जमिनीतील गट नंबर ३९१ ४२४ व ४२५ मोजणीत फेरफार केला असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे शेत जमिनीतील हद्दीखुणा बदलल्या गेल्या अशी तक्रार आहे याची फेर पडताळणी करून अहवाल मागवला आहे २४ एप्रिल २०२६ पूर्वी अहवाल येताच दोषी कर्मचारी सुनील साळवे व दिनेश पुसदकर निखिल मोरे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात येईल.

(संजय कुंभार - जिल्हाअधीक्षक भूमीअभिलेख कार्यालय अहिल्यानगर)

दैनिक
# राज्य लोकतंत्र


# सरकारने द्वेष भावनेतून शिक्षणातील आरक्षण रद्द केले

बीड । प्रतिनिधी

न्यायालयाने शिक्षणात ५ टक्के आरक्षण मान्य करुन ही राज्य सरकारने केवळ द्वेष भावनेतून हे आरक्षण रद्द केले. या निर्णयाच्या निषेधार्थ आणि तो आरक्षण पुन्हा कायम करण्याच्या मागणीसाठी बीड येथे आपल्या हक्कासाठी शुक्रवारी (दि. १७) मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चा बीड जिल्हाधिकारी कार्यालवर काढण्यात आला.यामध्ये आ. संदीप क्षीरसागर, माजी आ. सय्यद सलीम, माजी आ. उषा दराडे, नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, ॲड. शेख शफीक , बीड नगरपालिकेचे अनेक नगरसेवक मोर्चात सहभागी होते.

शुक्रवारी (दि.१७) दुपारी हातात राष्ट्रीय ध्वज घेऊन मुस्लिमांचा जनसागर शांतपणे किल्ला मैदान येथून जिल्हा कचेरीकडे मार्गस्थ झाला. कारंजा, बशीरगंज, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जिल्हा कचेरीवर धडकला. यानंतर मोर्चाचे रूपांतर सभेमध्ये झाले. शिक्षण, नोकरी, आर्थिक आणि सामाजिक सगळ्याच बाबतीत मुस्लिम समाज मागे असून, देश आणि राज्यातील मोठा समुदाय जर हालाखीचे आयुष्य जगत असेल तर देश आणि राज्य प्रगत कसे होईल यामुळे देशाच्या आणि राज्य विकसित कारयचे असेल तर मुस्लिम समाजाला ही समान संधी देत त्यांनाही विकासाच्या प्रवाहत आणण्यासाठी आरक्षण गरजेचे आहे. यामुळे महाविकास आघाडी सरकारने मुस्लिम समाजासाठी शिक्षण आणि नोकरीत ५ टक्के आरक्षण



## बीडमध्ये एल्गार मोर्चा, मुस्लिम समाज एकवटला

दिले होते. या निर्णयाच्या विरोधात काहीजण न्यायालयात गेले होते. यावेळी सुनावणी होऊन शासनाने नोकरी नाही मात्र शिक्षणामध्ये ५ टक्के मुस्लिम आरक्षण कायम ठेवले होते. मात्र यानंतर सत्तांतर होऊन भाजपा युतीचे सरकार आले आणि त्यांनी याची अंमलबजावणी केली नाही. काही दिवसांपूर्वी तर हे आरक्षणच रद्द केले. या निर्णयाच्या निषेधार्थ बीडमध्ये मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चाची हाक देण्यात आली. यानंतर येथे आरक्षण मोर्चाच्या कृती समितीने जिल्हाधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले.

बीड येथील किल्ला मैदान येथून शुक्रवारी दुपारी २.३० वाजता मोर्चाला सुरूवात झाली. मोर्चाच्या अग्रभागी एक लहान चिमुकली काळे कपडे परिधान करून शासनाचा प्रतिकात्मक निषेध करतांना दिसुन आली. राज्य शासनाने जाहीर केलेले ५ टक्के मुस्लीम आरक्षण रद्द केल्याने हा निषेध नोंदवला. हा मोर्चा किल्ला मैदान–बलभिम चौक–कारंजा–राजुरी वेस– बशीरगंज चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक, नगर रोड नागें मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चात जिल्हाभरातून आलेले समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### सर्वसमावेशक विकास हेच लोकशाहीचे मूल्य

२०१४ पूर्वी महाराष्ट्रातील काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसच्या लोकशाही आघाडी सरकारने मुस्लिम समाजाला ५% आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. मात्र, त्यानंतर सत्तेत आलेल्या भाजपा सरकारने हा निर्णय रद्द केला. यामुळे मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक प्रगतीवर मोठा परिणाम झाला. आजही मुस्लिम समाज अनेक स्तरांवर मागे आहे. त्यामुळे सध्याच्या महायुती सरकारने संवेदनशीलता दाखवून मुस्लिम समाजाला न्याय्य आरक्षण देऊन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणावे, ही ठाम मागणी आहे. समाजातील आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागे असलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणणे व सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकास हेच लोकशाहीचे मूल्य आहे.

– आ. संदीप क्षीरसागर



बीड : मुस्लिम समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आयोजित भव्य एल्गार मोर्चा निमित्त आलेल्या मुस्लिम समाज बांधवांसाठी अल्पोपहार व थंड पाण्याची व्यवस्था महाराष्ट्र राज्याचे मा.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा भूम परंडा वाशीचे विद्यमान आमदार मराठा भूषण मा. प्रा. डॉ. श्री. तानाजीराव सावंत साहेब तसेच मराठा संघर्ष योद्धा मा. मनोज दादा जरांगे पाटील तसेच बीडचे विद्यमान आमदार मा. संदीप भैया क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली अ. भा. छावाचे चे बीड जिल्हाध्यक्ष अशोक अण्णा रोमन तसेच मराठा सेवक गंगाधर नाना काळकुटे पाटील यांनी केले होते यावेळी अल्पोपहार घेताना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते मेहबूब भाई शेख तसेच सोबत छावा मित्रपरिवार व इतर मान्यवर.

# पाटोद्यात ३ कोटींचा पूल रेंगाळला; अर्धा भाग ढासळल्याने ‘विकास’ झाला अधांतरी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहराला बाजार समितीशी (मार्केट कमिटी) जोडणारा मांजरा नदीवरील अत्यंत महत्त्वाचा पूल सध्या सरकारी उदासीनता आणि भ्रष्टाचाराचा पुरावा बनला आहे. सुमारे ३ कोटी रुपये खर्चूनही हा पूल अद्याप अर्धवट अवस्थेत असून, त्याचे काम पूर्ण होण्यापूर्वीच काही भाग ढासळल्याने संताप व्यक्त केला जात आहे.



लोखंडी गज उघडे; अपघाताची भीती

मिळालेल्या माहितीनुसार, या पुलाचे बांधकाम अनेक महिन्यांपासून ठप्प आहे. उघडे पडलेले लोखंडी गज आणि अर्धवट सिमेंटचे खांब पुलाच्या दुरवस्थेची साक्ष देत आहेत. बाजार समितीला जोडणारा हा महत्त्वाचा मार्ग असल्याने शेतकरी आणि व्यापाऱ्यांसाठी हा पूल जीवनवाहिनी ठरणार होता, मात्र आता तीच वास्तू मृत्यूचा सापळा बनण्याची भीती निर्माण झाली आहे.

जनतेच्या पैशाचा 'महोत्सव'?

स्थानिक नागरिकांनी या कामावर तीव्र शब्दांत टीका केली आहे. हा विकास नसून भ्रष्टाचाराचा शेवटचा घटिका महोत्सव आहे, अशा शब्दांत नागरिकांनी आपला रोष व्यक्त केला. ३ कोटींसारखा मोठा निधी खर्च होऊनही जर पुलाचा भाग कोसळत असेल, तर कामाच्या दर्जाबाबत मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ◀◀ पान ३ वर

# मुंबईत १८ एप्रिलला युवाशक्तीचा महासंगम

### युवासेना महायुवोत्सवास बीड जिल्हासह मराठवाड्यातील पदाधिकारी व युवासैनिक मोठ्या संख्येने सहभागी होणार – विपुल पिंगळे

बीड । प्रतिनिधी

राज्यभर युवासेनेची संघटनात्मक ताकद अधिक भक्कम करण्यासाठी आणि नव्या तरुण नेतृत्वाला व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी युवासेनेचे वार्षिक संमेलन महायुवोत्सव २०२६ शनिवार, १८ एप्रिल रोजी मुंबईतील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, वरळी येथे भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आले आहे. सकाळी १०.०० ते सायं. ५.०० या वेळेत हा महायुवोत्सव पार पडणार असून, राज्यभरातून सुमारे १५ हजार युवक सहभागी होणार आहेत.



या संदर्भात वरळी येथे आयोजित पत्रकार परिषदेत युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांनी माहिती दिली की, शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथ शिंदे आणि युवा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या नेतृत्वात हा महायुवोत्सव संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार असून, याचवेळी युवासेनेच्या अधिकृत वेबसाइटचे अनावरण करण्यात येणार आहे. तसेच सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ आणि युवासेनेचे नवीन प्रेरणादायी गीतही या मंचावरून प्रदर्शित केले जाणार आहे.युवकांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा, संघटन विस्तार, नेतृत्व विकास, सामाजिक बांधिलकी आणि महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी नव्या दिशा ठरवण्याचा संकल्प या मंचावरून ◀◀ पान ३ वर

# जातनिहाय जनगणनेत ओबीसी जातीचा समावेश करून मुद्देनिहाय जनगणना करावी –वसंत मुंडे

परळी । प्रतिनिधी

आर एस एस च्या मनुवादी विचारसरणीमुळे केंद्रातील भाजप सरकारने ओबीसी जातीचा जनगणनेत समावेश केला नसल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला . भारत देशामध्ये जातनिहाय जनगणना ब्रिटिश सरकारने १९३१ ला चालू केली, त्यावेळेस पासून२०११ पर्यंत अनेक सरकारने जात निहाय जनगणना केली. परंतु भारत देशामध्ये ओबीसी आरक्षणा संदर्भात बीपी मंडल आयोग १९९० लागू करण्यात आले. परंतु भाजपा पक्षाचे धोरण आरक्षण विरोधी असून केंद्रातील व्ही पी सिंग सरकारचा मंडल आयोगाला विरोध म्हणून भाजपने पाठिंबा काढून घेऊन सरकार पाडले . मनमोहन सिंग पंतप्रधान असताना देशात जात निहाय जनगणना२०११ ला मुद्देनिहाय करण्यात आली. महाराष्ट्रातील देवेंद्र फडणवीस बीजेपीच्या सरकारने ओबीसीचा डाटा मुद्देनिहाय देण्यासंदर्भात वेळ काढून धोरण स्वीकारल्यामुळे दि.१२ जून२०१८ ला केंद्र सरकारला गुपित पत्र देऊन माहिती ठेवण्याचे सूचना आरएसएसच्या विचारधारेने बीजेपीच्या प्रत्येक राज्यातील सरकारला देण्यात आल्या त्यामुळे आरक्षण देण्यामध्ये संपूर्णपणे विलंब झाला. दीड टक्के जनगणनेचा डाटा न दिल्यामुळे सर्वोच्च न्यायालयात निर्णय पेंटिंग पडला. मनमोहन सिंग सरकारने ओबीसी जनगणना संदर्भात पाच हजार कोटी रुपये खर्च केला परंतु ओबीसीचा डाटा ही राष्ट्रीय संपत्ती आहे ,भारता मध्ये पशुपक्षी जनगणना होते परंतु ओबीसीची जातनिहाय जनगणना होऊन देण्यामध्ये मनुवादी भाजपा पक्षाच्या ◀◀ पान ३ वर



# पीक विम्यासाठी १ मे रोजी शेतकरी ग्रामपंचायतींना टाळे ठोकणार –भाई थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सन २०२५–२६ या वर्षाचा पीक विमा अद्यापही न मिळाल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. शासनाने लवकर विम्याची रक्कम द्यावी नसता एक मे रोजी ध्वजावणीनंतर शेतकरी आपापल्या गावातील ग्रामपंचायत कार्यालयाला टाळे ठोकतील असा इशारा शेतकरी नेते भाई गंगा भीषण थावरे यांनी यांनी इशारा दिला आहे.

थावरे म्हणाले की,अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाल्यानंतर राज्य सरकारकडून सरसकट १७ हजार रुपये हेक्टरी विमा देण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, ही घोषणा प्रत्यक्षात उतरली नसून आजपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यात एकही रुपया जमा झालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा संयम आता सुटू लागला आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाही, तर १ मे रोजी ध्वजारोहणानंतर ग्रामपंचायतींना टाळे ठोकून आंदोलन केले जाईल. तसेच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या गाड्याही अडविण्यात येतील.

दरम्यान, या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, २०२५–२६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे बीड जिल्हा जलमय झाला होता. या पार्श्वभूमीवर जिल्ह्याला ‘स्पेशल केस’ म्हणून सरसकट विमा देण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, प्रत्यक्षात आजपर्यंत कोणतीही आर्थिक मदत शेतकऱ्यांना मिळालेली नाही. बीड जिल्हा दुष्काळी म्हणून ओळखला जात असला तरी, कधी अतिवृष्टी तर ◀◀ पान ३ वर

# उद्या डॉ. विक्रम सारूक यांचे किर्तन

बीड । प्रतिनिधी

बीड येथील श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी नगररोड बीड येथे संत वामनभाऊ, संत भगवानबाबा यांच्या कृपा आशिर्वादाने प्रतिवर्षी प्रमाणे याहीवर्षी वर्ष १४वे संत वामनभाऊ, संतभगवानबाबा, संत तुकाराम, विठ्ठल–रूक्मिणि, हनुमान देवता मुर्ती प्राणप्रतिष्ठेच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त सर्व धर्म समभाव राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक दि १९/४/२०२६ते२१/४/२०२६ या कालावधी मध्ये त्रिदिवशीय हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे या सप्ताहाचे



प्रथम दिनी. दि१९ एप्रील रविवार रोजी रात्री ८वा ह भ प डॉ विक्रम महाराज सारूक यांचे हरिकिर्तन होईल तरी बीड शहरातील परीसरातील भाविक भक्तांनी किर्तन श्रावणाचा लाभ घ्यावा असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक व श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी चे अध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप व प्रतिष्ठानचे सर्व सहकारी व इंद्रप्रस्थ कॉलनी परिसरातील भाविक भक्त यांनी केले.

# बीडमध्ये उद्या सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्या भीमगीतांचा भव्य कार्यक्रम

बीड । प्रतिनिधी

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या संयुक्त जयंती निमित्त दि. १९ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्या भीमगीतांचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली होणार असून, या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागरांकडून करण्यात आले आहे.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या भीमगीतांच्या कार्यक्रमांतून नागरिकांना सामाजिक प्रबोधन आणि सांस्कृतिक आनंदाचा अनुभव घेता येणार आहे.आमदार संदीप क्षीरसागर यांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांची भीमगीते समाजाला प्रेरणा देणारी आणि जागृती निर्माण करणारी आहेत. या कार्यक्रमात सहभागी होऊन आपण सर्वांनी सामाजिक एकता आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचा संदेश पुढे न्यावा,'' असे त्यांनी सांगितले आहे. हा कार्यक्रम बीडमधील सर्व वयोगटातील नागरिकांसाठी खुला असून, मोठ्या उत्साहात त्याचे आयोजन करण्यात येत आहे. उपस्थितांना भीमगीतांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आणि कार्याचा गौरव अनुभवता येईल, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.

# बीडमध्ये ५ ठिकाणी छापे गुटख्यासह साडेआठ लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

बीड शहरात अवैध गुटखा विक्री करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कंबर कसली असून, दोन दिवसांत पाच वेगवेगळ्या ठिकाणी छापेमारी करून सुमारे ८ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबवण्यात आली.

जिल्ह्यात गुटखा विक्रीवर बंदी असूनही काही ठिकाणी छुप्या पद्धतीने विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुषंगाने १५ आणि १६ एप्रिल २०२६ रोजी बीड शहर पोलिसांनी शहरातील विविध भागांत छापे टाकले. या कारवाईत विविध कंपन्यांचा गुटखा, पानमसाला, मोबाईल फोन आणि गुटख्याची वाहतूक करणारे वाहन असा एकूण साडेआठ लाखांचा ऐवज पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

या आरोपींवर झाली कारवाई:

या प्रकरणी पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत:नामदार मोहिदीन शेख (रा. अक्सा मशिद जवळ, शहाशाह नगर, बीड)समशेर खान मुस्तफा खान (रा. गुलजार नगर, बीड)मोमीन अब्दुल मुजिब (रा. किशोर मेहता रोड, बीड)अफरोज यासीन तांबोळी (रा. इस्लामपुरा, बीड)लक्ष्मण दत्तूबा वाघुले (रा. नायगाव, ता. पाटोदा) – याच्या ताब्यातून सिद्धिविनायक ◀◀ पान ३ वर




# महिला सक्षमीकरणासाठी नारीशक्ती वंदन अधिनियम हा ऐतिहासिक कायदा ठरणार – रूपाली कचरे

माजलगाव । प्रतिनिधी

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली नुकतेच महिलांना लोकसभा व विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देऊन सशक्त भारताच्या दिशेने मोठे पाऊल उचलले आहे . याचाच एक भाग म्हणून भारतीय जनता पार्टी माजलगावच्या वतीने नारीशक्ती वंदन अभियानाला समर्थन देण्यासाठी दिनांक १६ एप्रिल गुरुवार रोजी सायंकाळी मंगलनाथ मंदिर येथे विविध क्षेत्रातील कार्य करणाऱ्या महिलांनी या नारीशक्ती वंदन



अधिनियम कायद्याला समर्थन देण्यासाठी उपस्थित राहिल्या व पंतप्रधान नरेंद्र मोदी,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण,नामदार पंकजा मुंडे,माजी खासदारप्रीतम मुंडे यांचे अभिनंदन करून धन्यवाद मानले.प्रस्ताविक पर मनोगत व्यक्त करताना तालुकाध्यक्ष रूपाली कचरे म्हणाल्या देशाच्या उज्वल भविष्यासाठी महिलांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून महिलांच्या राजकीय आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी ‘नारी शक्ती वंदन अधिनियम’ हा ऐतिहासिक टप्पा ठरणार असून नेतृत्व विकासाला चालना मिळेल व निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढणार व समाज देखील अधिक समतोल व सक्षम होईल असे मत भाजपाच्या कीट्टी आडगाव मंडळाच्या तालुकाध्यक्षा रूपाली कचरे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून उपस्थित असणाऱ्या माजलगाव येथील प्रसिद्ध विधीज्ञ आरती कांदुरे म्हणाल्या संसदेने मंजूर केलेल्या आणि आदरणीय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या स्वाक्षरीने १०६ वी घटनादुरुस्ती ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शनिवार दि.१८ एप्रिल २०२६ । पान ७

# पुण्यातील इन्फोसिसमध्ये छळवणूक, सोशल मीडियावर गंभीर आरोप; कंपनीचं स्पष्टीकरण

**पुणे । प्रतिनिधी**

नाशिकमधील टीसीएस कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांच्या शोषण प्रकरणांनंतर आता पुण्यातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आयटी सेक्टरमधील दिग्गज कंपनी इन्फोसिसच्या पुणे स्थित बीपीएम कॅम्पसवरुव सोशल मीडियावर अनेक गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या पोस्टमध्ये दावा केला जात आहे की, येथे काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांची छळवणूक केली जात आहे. दरम्यान याबाबत इन्फोसिसकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे.




इन्फोसिसने पुण्यातील आपल्या बिझनेस प्रोसेस मॅनेजमेंट (बीपीएम) युनिटमध्ये कामाच्या ठिकाणी छळवणुकीच्या सोशल मीडियावरील आरोपांवर अधिकृत निवेदन जारी केले आहे. कंपनीने कोणत्याही प्रकारच्या छळ किंवा भेदभावाबाबत झिरो टॉलरन्स धोरण असल्याचं स्पष्ट केलं आहे.

हे प्रकरण अशा वेळी समोर आले आहे, जेव्हा टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) विरोधात नाशिकमध्ये सुरू आहे. वेगळ्या फौजदारी चौकशीमुळे राज्यातील आयटी उद्योग अधिक तपासणीखाली आला आहे. त्या प्रकरणात कामाच्या ठिकाणी छळवणूक आणि सक्तीच्या धर्मांतराचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. पुण्यातील महिला कर्मचाऱ्यांसोबत अयोग्य वर्तन झाल्याचे आरोप करणाऱ्या काही पोस्ट्स 'द' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर व्हायरल झाल्यानंतर इन्फोसिसभोवती वाद निर्माण झाला. जरी संबंधित पोस्ट्स नंतर हटवण्यात आल्या असल्या, तरी राज्याचे मंत्री नितेश राणे यांनी सरकारने या प्रकरणाची दखल घेतल्याचे सांगितले आहे.इन्फोसिसने आपल्या निवेदनात म्हटलं आहे की, नोंदवलेल्या कोणत्याही समस्येची गंभीर दखल घेतली जाते आणि स्वतंत्र समितीद्वारे चौकशी केली जाते. कर्मचाऱ्यांना कोणतीही तक्रार मांडण्यासाठी 'बोलून दाखवा' संस्कृतीला प्रोत्साहन दिले जाते. कंपनीने अंतर्गत प्रक्रिया आणि प्रतिबंधात्मक यंत्रणा सक्रिय केल्याचंही स्पष्ट केलं. दरम्यान, नाशिकमधील टीसीएस प्रकरणात २०२२ ते २०२६ दरम्यान अनेक महिला कर्मचाऱ्यांवर छळ झाल्याचे आरोप असून, आतापर्यंत नऊ गुन्हे दाखल झाले आहेत. या तक्रारींमध्ये लैंगिक छळ, अयोग्य वर्तन, पाठलाग, मानसिक छळ तसेच सक्तीच्या धर्मांतराचे आरोपही समोर आले आहेत. तपास यंत्रणांनी ४० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असून, तक्रारदार आणि आरोपींचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू आहे. प्रकरणाचा तपास सुरू असून, अंतिम निष्कर्षापूर्वी सर्व बाबींची सखोल चौकशी केली जात असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

# मावळमध्ये एमआयडीसीला ग्रामस्थांचा विरोध; जमीन संपादनावर ठाम भूमिका



**मावळ । प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील करुंज व बऊर ग्रामपंचायत तसेच बाह्मणवाडी परिसरात आयोजित विशेष ग्रामसभांमध्ये प्रस्तावित एमआयडीसी स्थापन करण्यासाठी करण्यात येणाऱ्या जमीन संपादनास ग्रामस्थांनी एकमुखाने विरोध दर्शविला. सभांमध्ये शेतकऱ्यांच्या अडचणी व मागण्यांवर चर्चा झाली. ग्रामसभेत मांडलेल्या ठरावानुसार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (एमआयडीसी) शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करू नयेत, अशी भूमिका घेण्यात आली. शेतकर्यांना देण्यात येणाऱ्या नोटीस मागे घेण्याची मागणी करण्यात आली.

ग्रामस्थांनी स्पष्ट केले की, २००६ पासून या भागातील जमिनीवर विविध शिक्के मारण्यात आले. त्याचा शेतकऱ्यांवर मोठा परिणाम झाला. अल्पभूधारक शेतकऱ्यांचे क्षेत्र एमआयडीसीमध्ये समाविष्ट करू नये, संपादित होणाऱ्या क्षेत्रातील बागायती जमिनींची प्रत्यक्ष पाहणी करावी. याशिवाय १९९५-९६ दरम्यान द्रुतगतीमार्गासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी आधीच संपादित झालेल्या आहेत. उर्वरित जमिनीवरच त्यांचा उदरनिर्वाह सुरू असून, त्यादेखील संपादित झाल्यास शेतकरी भूमिहीन होण्याची भीती व्यक्त करण्यात आली. करुंज, बऊर, राऊतवाडी व लोखंडवाडी परिसरातील ग्रामस्थांनी या एमआयडीसी प्रकल्पाला तीव विरोध दर्शवित प्रकल्प रद्द करण्याची मागणी केली. प्रस्तावित एमआयडीसी क्षेत्रात मागील ३०-४० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या शेतकऱ्यांचे संसार उद्ध्वस्त होण्याची शक्यता असल्याचेही सभेत नमूद करण्यात आले.

# ११ महिन्याच्या चिमुकलीचा चुकीच्या पद्धतीने उपचार केल्याने मृत्यू, पुण्याच्या ४ डॉक्टरांविरुद्ध गुन्हा

**पुणे । पतिनिधी**

बालकावर चुकीचे उपचार केल्याने त्याचा मृत्यू झाल्याच्या आरोपावरून नवी पेठेतील एका रुग्णालयातील डॉक्टरांसह परिचारिकेविरुद्ध सहकारनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. या प्रकरणी डॉ. मुकुंद संगमनेरकर, डॉ. गणेश आरेकर, डॉ. श्रीधर जाधव, डॉ. राधा संगमनेरकर, तसेच परिचारिका मनीषा शिंदे, सारिका सुतार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



हनुमंत गणपतराव गिते (वय ३४, रा. हेरंब सोसायटी, बालाजीनगर, धनकवडी) यांनी सहकारनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, महाराष्ट्र वैद्यकीय व्यावसायिक अधिनियम २०२३ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हनुमंत गिते यांची मुलगी आदिती (वय ११ महिने) हिला उलटीचा त्रास होत असल्याने तिला मे २०२५ रोजी नवी पेठेतील एका खासगी रुग्णालयात उपचारांसाठी दाखल केले होते. उपचारात हलगर्जी केल्यास मुलीचा मृत्यू होऊ शकतो, याची जाणीव डॉक्टरांना होती. डॉक्टर, तसेच परिचारिकेने चुकीच्या पद्धतीने उपचार केल्याने मुलीचा मृत्यू झाल्याचा आरोप गिते यांनी पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत केला होता. पोलिस उपनिरीक्षक काळे तपास करीत आहेत. हे प्रकरण चौकशीसाठी ससून रुग्णालयातील वैद्यकीय तज्ज्ञांच्या समितीकडे सोपविण्यात आले होते. या प्रकरणाची वैद्यकीय तज्ज्ञांच्या समितीने चौकशी केली. चौकशीत अकरा महिन्यांच्या बालिकेवर चुकीच्या पद्धतीने उपचार करण्यात आले. वैद्यकीय निष्काळजीपणामुळे बालिकेचा मृत्यू झाल्याचा निष्कर्ष वैद्यकीय तज्ज्ञांच्या समितीने नोंदविला. त्यानंतर या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले.

# 'नारायणगाव केसरी' किताब सिकंदर शेखचा; तीन लाखांचे बक्षीस पटकावले




**पुणे । प्रतिनिधी**

या वेळी माजी आमदार अतुल बेनके, आशाताई बुचके,अनिल मेहेर, सुजित खैरे, विश्वस्त प्रकाश पाटे, देवदत्त निकम, गणपत फुलवडे, गुलाबराव नेहरकर, यांच्या हस्ते प्रमुख कुस्त्या लावण्यात आल्या. इनाम वितरणाचे काम दादाभाऊ खैरे, विलास पाटे, राजाराम पाटे, मुरलीधर फुलसुंदर, संजय खैरे यांनी पाहिले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी योगेश पाटे, संतोष खैरे, एकनाथ शेटे, अशोक पाटेसंतोष वाजगे आदींनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी माजी आमदार अतुल बेनके आशाताई बुचके अनिल मेहर बाबू पाटे यांची भाषणे झाली. नारायणगावचा प्रसिद्ध कुस्तीचा आखाडा पाहण्यासाठी परिसरातील हजारो कुस्तीप्रेमी उपस्थित होते. नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे यांनी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवला होता. पंच म्हणून अनिल गुंजाळ, अनिल मेहत्रे, एच. पी. नरसुडे यांनी काम पाहिले, तर समालोचन राजेश धायगुडे यांनी केले.

# पुणे जिल्हा परिषदेकडून सर्व १३ तालुक्यांत सीबीएसई शाळा सुरू करण्याचा निर्णय

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेने पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे सुरू केलेल्या सीबीएसई शाळेच्या धर्तीवर आता जिल्ह्यातील सर्व १३ तालुक्यांमध्ये अशा शाळा सुरू करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर शाळांसाठी योग्य जागा शोधण्याची मोहीम सुरू करण्यात आली असून, येत्या वर्षभरात ठिकाणे निश्चित करण्याचा मानस आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.




खानवडी येथील शाळेचे उद्घाटन झाल्यानंतर तीन कंपन्यांनी जिल्हा परिषद प्रशासनाशी संपर्क साधून अशा प्रकारच्या शाळा चालविण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे प्रत्येक तालुक्यात जागा निश्चित करताना भागीदारीसाठी योग्य संस्था किंवा कंपन्यांची निवड करण्याबाबतही विचारविनिमय करण्यात येणार असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले.

खानवडी येथील 'ज्योती सावित्री' शाळेत सध्या बालवाडी ते दुसरीपर्यंतचे वर्ग सुरू आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शाळेच्या नावातील 'इंटरनॅशनल' शब्द वगळण्यात आला आहे. शाळेला शासनाची मान्यता मिळाली असून, 'यूडीआयएस' क्रमांकासाठी प्रक्रिया सुरू आहे. प्रवेशप्रक्रियेबाबत कोणतीही तक्रार नसल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले. प्रवेशासाठी मार्गदर्शक तत्त्वे (एसओपी) तयार करण्यात आली असून, पुढील शैक्षणिक वर्षापूर्वी ती जाहीर केली जाणार आहेत. खानवडी परिसरातील गरीब कुटुंबांतील विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्याचा निर्णय कायम ठेवण्यात येणार आहे. यासाठी अगोदर ३२ गावांमध्ये सर्वेक्षण करून विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती.

सध्या बालवाडीसाठी १२० जागा उपलब्ध असून, गेल्या वर्षी ४८९ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी सुमारे २०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. आगामी काळात स्थानिक विद्यार्थ्यांना प्राधान्य देत एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेतली जाईल, असेही पाटील यांनी सांगितले.

# पुण्यात बेवारस वाहनांवर होणार कारवाई; वाहतूक पोलिसांची कारवाई सुरू

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातील सार्वजनिक रस्त्यांवर दीर्घकाळ उभी राहून वाहतुकीस अडथळा निर्माण करणारी, बेवारस किंवा वापरात नसलेली वाहने आता थेट जप्त केली जाणार आहेत. पुणे वाहतूक (झींपश ढीरषषळल णविरींश) पोलिसांकडून ही विशेष मोहीम बुधवार (दि. १५ एप्रिल २०२६) पासून सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेदरम्यान वाहतूक पोलिसांकडून महत्वाची पावले उचलली जाणार आहेत. सार्वजनिक रस्त्यांवर दीर्घकाळ उभी असलेली, धूळ खात पडलेली किंवा अयोग्य पद्धतीने पार्क केलेली वाहने शोधली जातील. संबंधित वाहनांवर नोटीस देण्यात येईल किंवा थेट नोटीस चिकटवली जाईल. नोटीस दिल्यानंतर ४८ तासांच्या आत पुढील कारवाई सुरू होईल. वाहन मालकाने २४ तासांच्या आत वाहन हटवले नाही, तर ते 'बेवारस' घोषित केले जाईल. अशा वाहनांना जप्त करून सुरक्षित ठिकाणी हलवले जाईल.



शहरातील रस्त्यांच्या कडेला दीर्घकाळ उभ्या ठेवलेल्या चारचाकी व दुचाकी वाहनांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याने वाहतूक पोलिसांनी आता कठोर कारवाईचा निर्णय घेतला आहे. अनेक वाहनमालक सूचना देऊनही आपली वाहने हलवत नसल्याने अशी वाहने 'बेवारस' म्हणून घोषित केली जात आहेत. यापुढे नोटीस देऊनही वाहन हलवले नाही, तर थेट जप्तीची कारवाई केली जाणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे. शहरातील प्रमुख मार्गांसह विविध भागांत रस्त्याच्या कडेला दीर्घकाळ उभी असलेली, धूळखात पडलेली वाहने मोठ्या प्रमाणात दिसून येतात. यामुळे वाहतूक कोंडी वाढते आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. या पार्श्वभूमीवर वाहतूक विभागाने विशेष मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेत संबंधित वाहनमालकांना प्रथम नोटीस बजावण्यात येणार असून, २४ तासांत वाहन न हलवल्यास ते बेवारस घोषित केले जाईल. त्यानंतर पुढील ४८ तासांत वाहन जप्त करण्यात येणार आहे.नजप्त करण्यात आलेल्या वाहनांवर महापालिकेमार्फत दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.

# शासकीय वसतिगृहात देशविरोधी घोषणाबाजी! दोन तरुणांवर गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील विश्रांतवाडी परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहात एका सांस्कृतिक कार्यक्रमादरम्यान देशविरोधी घोषणाबाजी आणि नक्षलवादी विचारसरणीचा प्रसार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी विश्रांतवाडी पोलिसांनी दोन तरुणांविरुद्ध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला असून, या घटनेचे पडसाद राज्यभर उमटत आहेत. विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहरातील एका शासकीय वसतिगृहात देशविरोधी विचारांचा प्रसार झाल्याची घटना समोर आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहात आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात नक्षलवादी विचारसरणीचे समर्थन करणारी घोषणाबाजी करण्यात आली. या प्रकारामुळे शहरातील शैक्षणिक वर्तुळात चिंतेचे वातावरण असून, अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली देशविघातक विचार पेरले जात असल्याचा आरोप होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ११ एप्रिल २०२६ रोजी वसतिगृहात एका सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सहभागी झालेल्या काही तरुणांनी देशाच्या सार्वभौमत्वाला आणि एकतेला बाधा निर्माण होईल, अशा पद्धतीची घोषणाबाजी केल्याचा आरोप आहे. नक्षलवादी विचारसरणीचा पुरस्कार करणारे विचार याठिकाणी मांडण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी किरण नारायण गोमासे (वय २२) आणि श्रीनिवास हनुमंत कुमरी (वय २३) यांच्यासह इतर काही जणांविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवला आहे. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत संशयित आरोपींना ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. या घटनेनंतर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी वसतिगृहाला भेट देऊन पाहणी केली. शासकीय वसतिगृहांमध्ये होणाऱ्या कार्यक्रमांवर आता प्रशासनाचे विशेष लक्ष असणार आहे. अशा प्रकारच्या देशविघातक कृत्यांना आळा घालण्यासाठी कठोर पावले उचलली जातील, असे संकेत पोलीस प्रशासनाने दिले आहेत. या घटनेमुळे पुणे शहरात मोठी खळबळ उडाली असून पुढील तपास विश्रांतवाडी पोलीस करत आहेत. नक्षलवादी विचारसरणीचा प्रसार केल्याच्या आरोपावरून किरण गोमासे आणि श्रीनिवास कुमरी या दोन तरुणांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या घटनेचे तीव्र पडसाद उमटत असून, वसतिगृहातील सुरक्षेचा आणि शिस्तीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# शिवचरित्र प्रसार अश्वमोहिमेचा शुभेच्छा समारंभ उत्साहात

**पुणे । प्रतिनिधी**

दिग्विजय प्रतिष्ठान हॉर्स रायडिंग अकॅडमीच्या वतीने आयोजित शिवचरित्र प्रसार अश्वमोहिमेचा शुभेच्छा समारंभ गुरुवारी (दि. १६ एप्रिल २०२६) सायंकाळी शिवसृष्टी, कात्रज-आंबेगाव येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास माजी आमदार दीपक राव पायगुडे, उद्योजक व शिवसृष्टी प्रकल्पाचे अध्यक्ष जगदीश कदम, तसेच विनीत कुबेर, सुधीर थोरात, सागर देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते.



दि. १७ एप्रिल ते १० मे या कालावधीत महाराष्ट्रातील २५ किल्ल्यांवरून ही अश्वमोहिम राबविण्यात येणार आहे. मोहिमेदरम्यान विविध ठिकाणी शिवचरित्र कथाकथन, व्याख्याने, तसेच शाहीरांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत सर्व किल्ल्यांवरून पाणी आणून ते रायगड येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी अर्पण करण्यात येणार असून त्यानंतर मोहिमेची सांगता होणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात शाहीर हेमंत मावळे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे लिखित छत्रपती शिवाजी महाराजांवरील पोवाडा सादर करून केली. यामुळे कार्यक्रमस्थळी उत्साहाचे आणि ऐतिहासिकतेचे वातावरण निर्माण झाले.

जगदीश कदम यांनी मनोगतात सांगितले की, २००५ पासून मी या संस्थेशी जोडलेलो असून अश्वारोहणापासून सुरू झालेल्या या उपक्रमाने विविध स्पर्धा व मोहिमांद्वारे उल्लेखनीय कार्य केले आहे. शिवसृष्टी प्रकल्पासाठीही संस्थेचे योगदान मोलाचे आहे. तसेच या मोहिमेद्वारे रोटरी पब्लिक इमेज कमिटीने जनसंपर्क वाढविण्याची जबाबदारी स्वीकारली असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुणेश पुरंदरे यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. अजित आपटे यांनी केले. यावेळी मोहिमेत सहभागी होणाऱ्या शिलेदारांचा तसेच २५ किल्ल्यांवरून पाणी आणणाऱ्या मावळ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व घोडेस्वारांना झेंडा दाखवून अश्वमोहिमेला उत्साहात प्रारंभ करण्यात आला, अशी माहिती रोटरी पब्लिक इमेज कमिटी सहसंचालक महेश घोरपडे यांनी दिली.

# जनसेवा सहकारी बँकेतर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**पुणे । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर (पुणे) यांच्या वतीने पुणे रेल्वे स्थानक येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी बँकेचे संचालक मंडळ सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच सर्व सेवक बंधू यांच्या उपस्थितीत सामूहिक अभिवादन करण्यात आले. डॉ. आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महान समाजसुधारक आणि अर्थतज्ज्ञ म्हणून ओळखले जातात. सामाजिक न्याय, समता आणि बंधुता या मूल्यांसाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. वंचित आणि दुर्लक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी अनेक ऐतिहासिक चळवळी उभारल्या. शिक्षणाला त्यांनी विशेष महत्त्व देत शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश समाजाला दिला. त्यांच्या कार्याचा गौरव करताना समाजातील सर्व घटकांसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची उपस्थितांनी आठवण करून दिली. दरवर्षीप्रमाणे यंदाही बँकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या स्टॉलवर नागरिकांसाठी पेयपानाची व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.




# गॅस टंचाईचा फायदा घेत लूट! १०३ सिलिंडरसह रॅकेट उघड

**पुणे । प्रतिनिधी**

सध्या घरगुती गॅस मिळवताना सामान्यांची दमछाक होत असतानाच, याचा गैरफायदा घेत घरगुती सिलिंडरमधील गॅस व्यावसायिक सिलिंडरमध्ये ट्रान्स्फर करून विकणार्या एकाला काळेपडळ पोलिसांनी अटक केली. हांडेवाडीत टाकलेल्या छाप्यात पोलिसांनी १०३ गॅस सिलिंडर जप्त केले आहेत. आरोपी सिलिंडर तब्बल ३ ते ५ हजारांना विकत होता. नितीन हनुमंत होळकर (वय ३८, रा. हांडेवाडी) याला अटक केली आहे.



जागतिक युद्धजन्य स्थितीमुळे सध्या गॅस सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. सामान्यांना गॅस मिळणे अवघड झाले आहे. याचा फायदा घेत होळकर घरगुती सिलिंडर साठवून ठेवायचा आणि गॅस संपलेल्या गरजू ग्राहकांना ते ३ ते ५ हजार रुपयांना काळ्या बाजारात विकायचा. ग्राहकाची गरज किती तातडीची आहे, यानुसार तो किंमत वाढवायचा. काळेपडळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक मानसिंग पाटील यांचे पथक गस्तीवर असताना पोलीस अंमलदार महादेव शिंदे यांना याची माहिती मिळाली. पोलिसांनी सापळा रचून धाड टाकली. यावेळी वेगवेगळ्या कंपन्यांचे १०३ सिलिंडर, गॅस ट्रान्स्फर करण्यासाठी लागणारे साहित्य असा ९० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीकडे गॅस साठवण्याची किंवा विक्रीसाठी कोणताही अधिकृत परवाना नाही. इतक्या मोठ्या प्रमाणात गॅस सिलिंडर आरोपीकडे कोठून आले, यामध्ये एखाद्या गॅस एजन्सीचे किंवा वितरकाचे संगनमत आहे का? याचा सखोल तपास पोलीस करत आहे.

cmyk